बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादक:बाळासाहेब मस्के

बीड शनिवार,दि.७ सप्टेंबर २०२४ | वर्षे४रे | अंक३७वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

## धुसफूस रोखण्यासाठी निर्णय

मुंबई:राज्याची विधानसभेची निवडणूक तोंडावर आल्यामुळे सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांनी कंबर कसली आहे. अनेक नेत्यांचे राज्यात दौरे सुरु असून मतदारसंघाचा आढावा घेतला जात आहे. महाविकास आघाडी आणि महायुतीमधील पक्षात विधानसभेच्या जागावाटपाबाबत खलबतं सुरु आहेत. मात्र, असं असतानाच गेल्या काही दिवसांपासून महायुतीमध्ये धुसफूस सुरु असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.काही दिवसांपूर्वी शिवसेनेचे नेते रामदास कदम यांनी मंत्री रवींद्र चव्हाण यांच्यावर टीका केली होती. त्यानंतर शिवसेनेचे नेते तानाजी सावंत यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या मंत्र्यांबरोबर बसल्यानंतर बाहेर आल्यावर उलट्या होतात, असं वक्तव्य केलं होतं. काही दिवसांपूर्वी भाजपाच्या एका नेत्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसला महायुतीत घेतल्यामुळे आमच्या कार्यकर्त्यांचं वाटोळं झाल्याचं म्हटलं होतं.




# ‘तू एकच काहीतरी कर बाबा’

## पलटवार: छगन भुजबळ यांचे मनोज जरागेंना आवाहन

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

मराठा आरक्षणासाठी आंदोलन करून नावारुपाला आलेल्या मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारला इशारा दिला असून आगामी विधानसभेला सत्ताधाऱ्यांचे ११३ आमदार पाडू, असे आव्हान दिले होते. जरांगे पाटील यांचे टीकाकार आणि ओबीसी आरक्षणासाठी संघर्ष करणाऱ्या छगन भुजबळ यांना याबद्दल नुकताच प्रश्न विचारण्यात आला. त्यावर भुजबळ यांनी मनोज जरांगे यांना प्रतिआव्हान दिले आहे. मनोज जरांगे यांच्यात हिंमत असेल तर त्यांनी २८८ मतदारसंघात उमेदवार उभे करून दाखवावेत, तसेच माझ्या विरोधात येवल्यातून निवडणूक लढवावी, असे छगन भुजबळ म्हणाले आहेत.छगन भुजबळ हे टीव्ही ९ वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीमध्ये बोलत होते. मनोज जरांगेंच्या प्रश्नावर बोलताना ते म्हणाले, रोज रोज भूमिका बदलण्यापेक्षा मनोज जरांगेंनी २८८ उमेदवार उभे करून दाखवावेत. प्रत्येक वेळी भूमिका बदलण्याचे कारण काय? कधी ते उपोषणाला बसतात, दुसऱ्या दिवशी उठतात. आता म्हणतात मुस्लीम समाजाला आरक्षण मिळवून देऊ. पण मुस्लिमांना २५ वर्षांपूर्वीच आम्ही आरक्षण दिलेले आहे. पण माहीत नसल्यामुळे जरांगे पाटील अर्धवट ज्ञानाच्या आधारे बोलतात. आता ते शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर पुढे येणार आहेत. पण माझे त्यांना आवाहन आहे की, त्यांनी एकच काहीतरी करावे.



### मला पाडण्यापेक्षा माझ्याच विरोधात उभा रहा!

मनोज जरांगे यांनी भुजबळ यांना निवडणुकीत पाडू, असे विधान केले होते. या विधानाबद्दल प्रश्न विचारला असता भुजबळ म्हणाले की, मला पाडण्यापेक्षा जरागेंनी माझ्याच विरोधात निवडणूक लढवावी. मला निवडणुकीत पाडले तरी माझा आवाज बंद होणार नाही. मला मागच्या पाच दशकांपासून संघर्ष करायची सवयच आहे. रस्त्यावर लढण्याची आणि सरकारमध्ये राहून काम करण्याची माझी तयारी आहे. येवला मतदारसंघात कुणीही येवो, पण मी लाखभर मतांनी निवडून येणार. जरागें पाटील यांनी काहीतरी एकच भूमिका घ्यावी आणि मग बोलावे, अशी टीका छगन भुजबळ यांनी केली.

## बोगस मतदारांची नावासह यादी सुपूर्द!

### अनिल जगताप: लोकशाहीची गळचेपी केली

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीडमधील प्रस्थापित राजकारण्यांनी स्वतःच्या विजयाची समीकरणे जुळून आणण्याकरिता बोगस मतदारांची नावे मतदान यादीत लावून घेतली असून ही बोगस मतदारांच्या नावांची संख्या तब्बल २५१६१ एवढी मोठी असल्याचे समोर आले आहे. सर्व यादी तपासली असता २५१६१ मतदारांची नावे ग्रामीण आणि शहरी भागातील दोन्ही मतदान यादीत असल्याचे आढळून आले आहे. मतदान यादीत दोनदा नाव असल्याने ही मतदार दोन वेळा मतदानाचा हक्क बजावत आले आहेत. लोकशाहीची गळचेपी करणाऱ्या या अत्यंत महत्वपूर्ण मुद्यावर शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांनी आवाज उठवला

पान २ वर...



### दुबार मतदान करणाऱ्यांनो सावधान

बोगस मतदान करणाऱ्यास एक वर्ष सश्रम करावासाची शिक्षा आणि पाचशे रुपये दंड असून मतदान यादीत दोनदा नाव असणाऱ्यांची यादी नावासह प्रत्येक पोलिंग बूथवर जाहिरात फलकाची उभारणी करून प्रसिद्ध करण्यात येणार आहे. यामुळे विधानसभा निवडणुकी दरम्यान नेत्या पुढऱ्याचं बळ पाठीशी आहे म्हणून कुणीही दुबार मतदानाचा हक्क बजावू नये, शिवसैनिकांची आता करडी नजर प्रत्येक बूथवर बोगस मतदान करणाऱ्यांवर असणार आहे. दुबार मतदान करताना कुणी आढळून आल्यास शिवसेनेकडून त्यास त्याच ठिकाणी योग्य तो जाब देण्यात येईल असा आवाहनात्मक इशारा शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांनी बोगस मतदान करणाऱ्यांना दिला आहे.

## पात्रुड येथे मुस्लिम समाजाचा मोर्चा

### आंदोलन : रामगिरी महाराज,आ.नितेश राणेवर कारवाई करा




माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनीधी

प्रेषित (पैंगबर)हजरत मोहम्मद यांची बदनामी होईल असे वक्तव्य करणारे रामगिरी महाराज व मुस्लिम समाजाला मारण्याची धमकी दिलेल्या आमदार नितेश राणे यांच्या वर कठोर कारवाई करण्यात यावी हि मागणी करत त्यांच्या वक्तव्याचा निषेध व्यक्त करून माजलगाव तालुक्यातील पात्रुड येथील सकल मुस्लिम समाजा कडुन ६सप्टेंबर शुक्रवार रोजी मोर्चा काढण्यात आला. यावेळी तलाठी,पात्रुड यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, काही दिवसांपूर्वी रामगिरी महाराज यांनी हजरत मोहम्मद पैंगबर यांच्या बद्दल वादग्रस्त वक्तव्य केले होते त्याने मुस्लिम समाजाच्या भावना दुखावल्या आहेत.तसेच जाणुन बुजुन ते वक्तव्य करुन रामगिरी महाराज यांनी कायदा व सुव्यवस्था बिघडवण्याचा प्रयत्न केला आहे, संविधानाने

पान २ वर...

## सत्ताधारी भाजपाला धक्का; हरियाणात सत्तांतार होणार?

### सत्तांतर: विनेश फोगट, बजरंग पुनिया काँग्रेसमध्ये

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

हरियाणामध्ये ५ ऑक्टोबर रोजी विधानसभेसाठी मतदान होणार आहे. भाजपाकडून सत्ता हिसकाविण्यासाठी काँग्रेस जोरदार तयारी करत आहे. आम आदमी पक्षाशी आघाडीची चर्चा केल्यानंतर आता ऑलिम्पियन कुस्तीपटू विनेश फोगट आणि बजरंग पुनिया यांना काँग्रेसमध्ये प्रवेश देण्यात आला आहे. आगामी विधानसभा निवडणुकीत दोघांना उमेदवारी दिली जाणार असल्याची घोषणा आज करण्यात आली. दोन्ही कुस्तीपटू जाट समुदायाचे प्रतिनिधित्व करतात. शेतमालाला किमान आधारभूत किंमत मिळावी, यासाठी शेतकऱ्यांचे २०० दिवसांहून अधिक काळ



शंभू बॉर्डरवर आंदोलन सुरू आहे. यामध्ये जाट समुदायाच्या शेतकऱ्यांचा मोठा भरणा आहे. तसेच हरियाणामध्येही जाट समुदायाचा मोठा प्रभाव आहे. या अनुषंगाने हरियाणा विधानसभेत काँग्रेसला कसा लाभ होणार याचा घेतलेला आढावा.फोगट आणि पुनिया यांना पक्षात प्रवेश दिल्यामुळे जाट समुदायाच्या पाठिंब्यासह महिला, क्रीडापटू आणि युवकांचा काँग्रेसला पाठिंबा मिळू शकतो. हरियाणाचे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष दीपक बाबरीया यांनी नुकतेच सांगितले होते की, विनेश फोगटची उमेदवारी लवकरच जाहिर केली जाईल. काँग्रेसकडून जुलना आणि

पान २ वर...

## नाथ प्रतिष्ठानकडून गणेश महोत्सव

### मंत्री धनंजय मुंडे: परळीत दहा दिवसांची सांस्कृतिक मेजवानी

परळी/ पुण्यभूमी प्रतिनिधी

राज्याचे कृषिमंत्री, बीड जिल्ह्याचे पालकमंत्री तसेच नाथ प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेचे अध्यक्ष धनंजय मुंडे यांच्या नाथ प्रतिष्ठानच्या मार्फत दरवर्षी साजरा केला जाणारा व महाराष्ट्रभर ख्याती असलेला श्री वैद्यनाथ सार्वजनिक गणेश महोत्सव यावर्षी १९ व्या वर्षात पदार्पण करत असून यावर्षी देखील श्री गणेश महोत्सवाचे परळी शहरात आजपासून दिमाखदार आयोजन करण्यात येत आहे.



आज श्री गणेश चतुर्थीच्या दिवशी ना.धनंजय मुंडे यांच्या हस्ते शुभमुहूर्तावर श्रींची स्व.पंडित अण्णा मुंडे सहभागृह, जत्रा मैदान, परळी येथे विधिवत स्थापना करून या गणेश महोत्सवास सुरुवात होईल. या गणेश महोत्सवाच्या उद्घाटन कार्यक्रमास नॅशनल क्रश म्हणून ओळख असलेली पुष्पा फेम अभिनेत्री रश्मिका मंदाना तसेच रामायण चित्रपटातुन देशाच्या घराघरात पोहोचलेली सीतेचा अभिनय अत्यंत उत्कृष्टरित्या केलेली अभिनेत्री क्रिती सनोन या दोघींची प्रमुख उपस्थिती असणार आहे. तर ता उदघाटन कार्यक्रमाचे निवेदन अभिनेता संकर्षण कऱ्हाडे करणार आहे.यावर्षीच्या गणेश महोत्सवात प्रतिवर्षी पेक्षाही उत्तम दर्जाच्या कलाकारांच्या उपस्थितीत परळी वासियांना सांस्कृतिक कार्यक्रमांची

पान २ वर...



## निर्भया, अभया, अपराजिता आणि

ममता बॅनर्जी यांचे आडमुठे राजकारण जगजाहीर आहे. संयम, सहिष्णुता, उदारमतवाद आदी गुणांचा आणि ममतादीदींचा फारसा ऋणानुबंध नाही. काही आठवड्यांपूर्वी पश्चिम बंगालची राजधानी कोलकाता येथील रुग्णालयातील महिला डॉक्टरवर झालेला लैंगिक अत्याचार, तिची हत्या आणि नंतर त्या प्रकरणाची हाताळणी या मुद्द्यांवर दीदींविषयी बरे बोलावे असे काही नाही. त्याबाबत राष्ट्रीय पातळीवर क्षोभ निर्माण झाला आणि ते रास्तच होते. या प्रकरणात पुरती नाचक्की झाल्यानंतर दीदींनी महिलांवरील अत्याचार कसे रोखावेत यावर चर्चा करणारी दोन पत्रे पंतप्रधानांस लिहिली. ते वरातीमागून घोडे हाकण्यासारखे होते. राज्याच्या मुख्यमंत्री या नात्याने स्वत: जे काही करणे अपेक्षित आहे ते करावयाचे नाही, त्याबाबतच्या सल्लासूचनांबाबत हट्टीपणा करायचा आणि नंतर फारच आरडाओरड झाल्यावर इतरांच्या नावे बोटे मोडायची असे त्यांनी अनेकदा केलेले आहे. या वेळी त्याचा जास्त बभ्रा झाला. कारण प्रश्न महिलांची इभ्रत, इज्जत आणि महिला मुख्यमंत्र्याचे इमान या मुद्द्यांचा होता. इतके करूनही हे प्रकरण शांत होत नाही हे पाहिल्यावर त्यांच्या सरकारने महिलांवरील अत्याचार यापुढे कसे हाताळले जातील याबाबत नवा 'कायदा' केला. त्याची दखल घेणे आवश्यक. याची प्रमुख कारणे तीन. राजकीय, वैधानिक आणि असे अन्य कायदे. प्रथम राजकीय मुद्द्याविषयी. कारण या विधेयकास विधानसभेत खुद्द भाजपनेच 'शत-प्रतिशत' पाठिंबा दिला. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आणि त्यांचे एकेकाळचे सहकारी आणि विद्यमान भाजप-नेते सुवेंदु अधिकारी यांच्यातून विस्तव जात नाही. पण विधानसभेत या कायद्याचा प्रस्ताव आला तेव्हा अधिकारीबाबूंनी त्याचे स्वागत केले आणि या कायद्याची गरज कशी आहे हे ते सांगू लागले. यातील वादी-संवादी मुद्दा ममता आणि सुवेंदुबाबू यांच्या भाषणातील. ममता यांनी आपल्या या संदर्भातील भाषणात थेट पंतप्रधानांवर कडाडून हल्ला केला आणि देशातील महिलांच्या रक्षणार्थ ते कसे अपयशी ठरले याचा लांबलचक पाढा वाचला. दुसरीकडे सुवेंदुबाबूंनी हेच मुद्दे ममतादीदींबाबत मांडले. त्यांच्या मते दीदींनी राजीनामा देण्याची गरज आहे. म्हणजे ममतांना पंतप्रधानांचा राजीनामा हवा आणि सुवेंदुंना ममताबाईंचा. पण ममताबाईंचा राजीनामा हवा असेल तर त्यांनी मांडलेल्या विधेयकास एकमुखी पाठिंबा, हे कसे? या प्रश्नाचे उत्तर ममताबाईंनी राज्य भाजपसमोर निर्माण केलेल्या पेचात आहे. या विधेयकास विरोध केला तर आपण महिला-संरक्षण-विरोधी दिसण्याचा धोका आहे, हे लक्षात आल्याने राज्य भाजपस ममताबाईंच्या प्रयत्नांची तळी उचलून धरण्याखेरीज पर्याय राहिला नाही. पण राज्य भाजपच्या या अपरिहार्यतेमुळे आणखी दोघांची अडचण होणार. राज्यपाल आणि राष्ट्रपती. पश्चिम बंगालच्या राज्यपालांना या कायद्यास मान्यता देणे लांबवता येते का, हे आता पाहावे लागेल. एरवी भाजपेतर राज्यांचे राज्यपाल विधेयके महिनोनमहिने अडवून ठेवतात. आता ते या विधेयकाबाबतही तसेच करणार काय? शिवाय राज्यपालांनी या विधेयकास मंजुरी दिल्यावर प्रश्न राष्ट्रपतींचा. अन्य अनेक भाजपेतर राज्यांची विधेयके राष्ट्रपती भवनात धूळ खात आहेत. आता राष्ट्रपती भवनातील महामहिमा द्रौपदी मुर्मू या विधेयकाबाबतची दिरंगाई टाळणार का? टाळली तरी टीका आणि न टाळावी तरी टीका, अशी ही अडचण.दुसरा मुद्दा या कायद्यातील तरतुदींचा. पश्चिम बंगालचे शहाणपण असे की नुसत्या बलात्काराच्या गुन्ह्यातील आरोपींस ते फाशीची शिक्षा सुचवत नाही. बलात्कार आणि नंतर हत्या असे गुन्ह्याचे स्वरूप असेल तर हे विधेयक आरोपीस फाशीची शिक्षा सुचवते. केवळ बलात्काऱ्यांस आजन्म कारावास या कायद्यात प्रस्तावित आहे. हे योग्य अशासाठी की बलात्कारासही फाशीची शिक्षा ठोठावली जाऊ लागली तर आरोपी बलात्कारित अभागीस जिवंत न ठेवण्याची शक्यता अधिक. तसे होऊ लागल्यास बलात्काराचा गुन्हा सिद्ध होण्यात अधिक अडचणी येतील आणि त्यामुळे आरोपींवरील गुन्हा सिद्ध करणे अधिक आव्हानात्मक होईल. तेव्हा बलात्काऱ्यांस फाशी हवी असा आक्रोश अलीकडे वाढू लागला असला तरी त्यात वैधानिक शहाणपण नाही. तृणमूल सरकारच्या या प्रस्तावित कायद्यात हे शहाणपण दिसते. यातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा आहे तो बलात्काराचा गुन्हा नोंदला गेल्यानंतर २१ दिवसांत त्याचा तपास पूर्ण करण्याची हमी. यात जास्तीत जास्त १५ दिवसांची मुदतवाढ होऊ शकते. तसेच अशी प्रकरणे किमान पोलीस अधीक्षक वा वरिष्ठ अधिकाऱ्यांकडूनच हाताळली जातील, असे हा कायदा म्हणतो. तथापि यानंतर ३० दिवसांत न्यायिक प्रक्रिया पूर्ण करण्याची हमी हा प्रस्तावित कायदा देतो, ते कसे? सरकार स्वत: काय करू शकते यास बांधील राहील हे ठीक. पण न्यायालयास असे काही बंधन सरकार घालू शकते काय? तसे ते घालण्यासाठी बलात्कार, लैंगिक अत्याचारांची सर्व प्रकरणे जलदगती निकाली काढली जावीत यासाठी राष्ट्रीय स्तरावर कायदा व्हायला हवा. एकट्या पश्चिम बंगालचाच अपवाद त्यास कसा काय करणार? ममताबाई याचे उत्तर देण्याच्या फंदात काही पडलेल्या नाहीत. आता तिसरा मुद्दा म्हणजे नुसती बोंब हेच या सगळ्याचे तात्पर्य. या अशा भयानक गुन्ह्यांत बळी ठरलेल्या अभागी महिलांस निर्भया, अभया आणि आता पश्चिम बंगालचे अपराजिता असे उदात्त नामकरण करायचे. पण प्रत्यक्ष कृती शून्य. असे आणखी काही नामकरण करण्याची संधी (?) मिळायच्या आधी तरी हे वा असे कायदे प्रत्यक्षात यावेत. अन्यथा नुसती फुकाची शब्दसेवा आहेच.

# गणेशोत्सव जागतिक लोकोत्सव होईल

## अध्यात्मिक : पुणे येथे ग्लोबल गणेश फेस्टिवल

पुणे/पुण्यभूमी प्रतिनिधी

'लोकसहभाग, तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर, गणेशोत्सवादरम्यान परदेशी लोकांना आवश्यक सुविधा, मार्गदर्शन, जागतिक स्तरावर आयोजित होणाऱ्या गणेशोत्सवाला जोडून घेत उत्सवाचे आदानप्रदान झाले, तर ऐतिहासिक परंपरा असलेला गणेशोत्सव जागतिक लोकोत्सव होईल, अशा भावना गणेशोत्सवातील सक्रिय कार्यकर्त्यांनी व्यक्त केल्या.

पहिल्यांदाच होत असलेल्या 'ग्लोबल गणेश फेस्टिवल'चे उद्घाटन परदेशी तरुणांच्या हस्ते गुरुवारी करण्यात आले. पुण्यातील गणेशोत्सव आयोजनात अग्रस्थानी असलेल्या कार्यकर्त्यांच्या पुढाकारातून यावर्षीपासून आयोजित 'ग्लोबल गणेश फेस्टिवल'च्या निमित्ताने ग्लोबल गणेश समिटही यावेळी झाली. शिवाजीनगर येथील हॉटेल प्राईड येथे आयोजित कार्यक्रमावेळी आफ्रिकन विद्यार्थी त्रिश व त्रोबा, जर्मन विद्यार्थिनी लोताया, डॉ. रघुनाथ कुचिक, डॉ. सतीश देसाई, रामनाथ सोनवणे, संयोजक वैभव वाघ, महेश सूर्यवंशी, शिरीष मोहिते, उदय जगताप, ॲड. अनिष पाडेकर, विनीत परदेशी, पियुष शहा, नितीन पंडित, धनश्री वाघ-पाटील, अनिरुद्ध येवले, योगेश आलेकरी आदी उपस्थित होते.या समिटमध्ये ग्लोबल गणेशोत्सवाने कशाप्रकारे पुण्याचे अर्थकारण व धार्मिक पर्यटन बदलेल, सोलो ट्रॅव्हलचा गणेशोत्सवाला होणारा फायदा, ग्लोबल गणेश पर्यटन, मोरया हेल्पलाईन, रोटरी क्लबचा ग्लोबल गणेश फेस्टिवलला होणारा फायदा,



गणेशोत्सव जागतिक होण्यासाठी शिक्षणसंस्थांची भूमिका काय असेल, भारतीय आयोजकांनी काय करावे, शासनाची धोरणे व उपक्रम काय असावेत, अशा विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.वैभव वाघ म्हणाले, जगातील अनेक महोत्सवांपेक्षा गणेशोत्सव हा अधिक व्यापक व भव्यदिव्य स्वरूपाचा आहे. परंतु, या उत्सवाला म्हणावी तशी जागतिक स्तरावर ओळख मिळाली नाही. या उत्सवाचा पर्यटन केंद्र म्हणूनही मोठा विकास होऊ शकतो. परदेशी पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी, त्यातून रोजगारनिर्मिती उभारण्यासाठी आणि आपला पारंपरिक व ऐतिहासिक गणेशोत्सव जगभर जाण्यासाठी 'ग्लोबल गणेश फेस्टिवल' आयोजित करण्यात येत आहे. यावर्षीपासून जास्तीत जास्त आंतरराष्ट्रीय पर्यटकांपर्यंत पोहचणे हेच मुख्य धेय आहे. जागतिक गणेश मंडळे व पुण्यातील गणेश मंडळांचा सामंजस्य करार घडवून आणण्यावर भर दिला जाणार आहे. यानिमित्ताने जागतिक स्तरावर विविध प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन केले जाणार आहे.

डॉ. सतीश देसाई म्हणाले की, गणेशोत्सव जगाच्या नकाशावर जाण्यासाठी स्थानिक व परदेशी आयोजकांनी एकमेकांशी समन्वय साधायला हवा. वैभवचे काम उल्लेखनीय असून, सातत्याने नाविन्यपूर्ण कल्पना राबवतो. ग्लोबल गणेशमुळे पुण्याचा गणेशोत्सव जगभर जाईल, असे भारत देसडला यांनी नमूद केले.

महेश सुर्यवंशी यांनी धार्मिक पर्यटन विकसित करण्यासाठी आवश्यक त्या पायाभूत सुविधा उभारण्याची गरज असल्याचे सांगितले. गणेशोत्सव ग्लोबल आहेच, त्याची ओळख आणखी व्यापक करायला हवी, असे त्यांनी नमूद केले. योगेश आलेकरी म्हणाले, जगभर फिरत असताना मला अनेक सण साजरे करता आले. भारतातही परदेशी पर्यटक येतात; त्यांच्यासाठी पूरक गोष्टींची उपलब्धता करून द्यायला हवी.यावेळी 'मोरया हेल्पलाईन'ची घोषणा करण्यात आली. परदेशातून येणाऱ्या पर्यटकांना धार्मिक स्थळांना भेटी देण्यासाठी ही हेल्पलाईन सहकार्य करेल, असे उदय जगताप यांनी नमूद केले. सूत्रसंचालन चिद्विलास क्षीरसागर यांनी केले. अमित जाधव यांनी आभार मानले.

## शिंदे मुख्यमंत्रीपदाचा चेहरा नाहीत?

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी



आगामी विधानसभा निवडणूक काही दिवसांवर येऊन ठेपली असताना महायुतीकडून मुख्यमंत्री पदाचा चेहरा कोण? अशी चर्चा सध्या राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. यावर राजकीय प्रतिक्रियाही उमटू लागल्या आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांपासून ते अजित पवारांपर्यंत अनेकांनी याबाबत प्रतिक्रिंया दिली आहे. दरम्यान, आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी याबाबत भाष्य केलं आहे.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज ( शुक्रवारी,६ सप्टेंबर) वृत्तवाहिनीला मुलाखत दिली. यावेळी बोलताना त्यांनी विविध विषयांवर त्यांची भूमिका स्पष्ट केली. यादरम्यान, त्यांना महायुती जर तुमच्या नेतृत्वात निवडणूक लढवत असेल तर तुम्हाला महायुतीचा मुख्यमंत्रीपदाचा चेहरा म्हणून का घोषित करत नाही, असा प्रश्न विचारण्यात आला. याबाबत बोलताना, आम्हाला मुख्यमंत्री पदासाठी घाई नाही. मी मुख्यमंत्री असलो तरी मुख्यमंत्रीपदाचा चेहरा नाही, मुख्यमंत्रीपदाबाबत आम्ही महायुती म्हणून निर्णय घेऊ, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.मी कधीही मुख्यमंत्रीपदाची अपेक्षा केली नव्हती. मी सतत काम करत राहिलो. काम केल्यानंतर त्याची नोंद जनता ठेवत असते. आजही महायुतीमध्ये मला काय मिळेल? यापेक्षा मी जनतेला काय देऊ शकतो? अशी माझी भूमिका आहे. गेल्या अडीच वर्षात आम्ही जे काम केलं आहे, राज्याचा जो विकास केला आहे, ते जनतेला माहिती आहे. आम्हाला मुख्यमंत्रीपदासाठी कोण कोणतीही घाई नाही. आम्ही वैयक्तिक स्वार्थापेक्षा महाराष्ट्राचा विचार करतो, अशी प्रतिक्रिया एकनाथ शिंदे यांनी दिली.दरम्यान, तानाजी सांवत यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या मंत्र्याबरोबर बसताना उलट्या येतात, असं विधान केलं होतं. याबाबत विचारलं असता, तानाजी सांवत यांना मी सांगितलं, की आपण महायुतीमध्ये आहोत. महायुतीत बेबनाव होईल, असं कुठलंही वक्तव्य करता कामा नये. महायुतीत भांड्याला भांडं लागतं. कुटुंबातही कधीकधी मतभेद होतात. महायुतीत छोट्या-मोठ्या कुरबुरी आहेत, त्या मिटून जातील, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.

## पान एक वरून

### बोगस मतदारांची नावासह

असून काल दि. ५ सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी १.०० वाजताच्या दरम्यान २३०-बीड विधानसभा मतदार संघामध्ये असणाऱ्या २५१६१ दुबार नावांची यादी शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे मा. जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे आणि उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी बीड यांच्याकडे प्रत्येकी एक प्रत शिवसेना पदाधिकाऱ्यांनी सुपूर्द केली. याबरोबरच दुबार मतदारांच्या यादीबाबत तात्काळ योग्य ती कारवाई करून लोकशाहीची गळचेपी करणारा प्रस्थापितांचा हा अनधिकृत असलेला घाणेरडा डाव हाणून पाडावा असे आवाहन देखील जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी आणि उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी बीड यांना शिवसेना पदाधिकाऱ्यांनी केले. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या वतीने निवेदन देण्याकरिता शिवसेना जिल्हा संघटक सुनील भाऊ सुरवसे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख संतोष भाऊ जाधव, शिवसेना उप-तालुकाप्रमुख भारतजी देवकते, शिवसेना उप-शहरप्रमुख हनुमानप्रसादजी पांडे, आकाश जगताप, प्रतिक कांबळे, सखाराम सातपुते यांच्यासह आदी उपस्थित होते.

### पात्रुड येथे मुस्लिम समाजाचा

दिलेल्या अधिकाराने प्रत्येक व्यक्ती त्याच्या धर्माचे पालन करु शकतो म्हणुन सर्व धर्म समभावाची शिकवण देणारा भारत देश आहे.काहि दिवसां पासुन आमदार नितेश राणे सुद्धा मुस्लिम समाजा बद्दल गरळ ओकत आहेत १सप्टेंबर रोजी अहमदनगरच जिल्हयात एका कार्यक्रमात बोलतांना त्यांनी हिंदु-मुस्लिम समाजात तेढ निर्माण होईल या हेतुने मुस्लिमांना मस्जिद मध्ये घुसुन, चुन,चुन के मारेंगे. असे बेताल वक्तव्य करुन धमकी दिली आहे. त्यामुळे दोघांच्याही वक्तव्यांचा कायदा व सुव्यवस्था हेतु असल्याने तात्काळ त्यांच्या वर कठोर कारवाई करण्यात यावी.

### सत्ताधारी भाजपाला धक्का

बदली या दोन मतदारसंघाची चाचपणी करण्यात येत आहे. दोन्ही मतदारसंघात जाट समुदायाचे प्राबल्य आहे. बदली मतदारसंघाचे प्रतिनिधित्व सध्या काँग्रेसचे कुलदीप वत्स करत आहेत. तर जुलना विधानसभेत जननायक जनता पक्षाचे (गगझ) अमरजीत ढांडा आमदार आहेत. दिल्लीमधील काँग्रेसच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार विनेश फोगट जुलना किंवा दादरी आणि बजरंग पुनिया बदली मतदारसंघातून निवडणूक लढवू शकतात. नुकत्याच झालेल्या पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत ५० किलो वजनी गटाच्या अंतिम फेरीत विनेश फोगटने धडक मारली होती. अंतिम फेरी गाठणारी ती पहिलीची महिला कुस्तीपटू ठरली होती. मात्र केवळ १०० ग्रॅम वजन अधिक भरल्यामुळे तिला स्पर्धे तून बाद करण्यात आले आणि विनेशचे सुवर्णपदक थोडक्यात हुकले. १९ ऑगस्ट रोजी विनेश फोगट भारतात परतल्यापासून काँग्रेसच्या नेत्यांनी तिला पाठिंबा दिला होता. दिल्ली विमानतळावर काँग्रेसचे खासदार दिपेंदर हुडा यांनी तिचे स्वागत केले. तर हरियाणा विधासभेतील विरोधी पक्षनेते भूपिंदर सिंह हुडा यांनी जाहिर केले की, जर पुरेसे संख्याबळ मिळाले तर आम्ही विनेशला राज्यसभेत पाठवू. आंतरराष्ट्रीय बॉक्सर विजेंदर सिंहने २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसच्या तिकीटावर दक्षिण दिल्ली मतदारसंघातून निवडणूक लढविली होती. मात्र तो तिसऱ्या स्थानावर राहिला. काही महिन्यांपूर्वीच त्याने भाजपामध्ये प्रवेश केला आहे. यावेली हरियाणा विधानसभा निवडणूक लढविण्यासाठी तो आग्रही असल्याचे समजते. भिवानी जिल्ह्यातील कलुवास या मुळ गावी जाऊन राजकीय नशीब अजमावण्याचा त्याचा प्रयत्न आहे.

### नाथ प्रतिष्ठानकडून गणेश

मोठी मेजवानी गणेशोत्सवाचे १० ही दिवस अनुभवायला मिळणार आहे. पहिल्या दिवशी सात सप्टेंबर शनिवारी अभिनेता संकर्षण कराडे त्याचबरोबर सिने अभिनेत्री सोनाली कुलकर्णी, तेजा देवकर, ऋतुजा जुन्नरकर, पूनम कुडाळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत सांस्कृतिक कार्यक्रम तर दुसऱ्या दिवशी ८ तारखेला रविवारी सायंकाळी प्रसिद्ध गायक कैलाश खेर व गायिका अभिलिप्सा पांडा यांच्या शिव भजन गीतांचा कार्यक्रम होईल. ९ सप्टेंबर, सोमवार, अभिनेत्री अमृता खानविलकर, पूजा सावंत, समीरा गुजर, संस्कृती बालगुडे, प्रसंनजीत कोसंबी व अंशिका चोनकर यांचा महाराष्ट्राच्या तारका हा सुप्रसिद्ध संगीतमय कार्यक्रम.१० सप्टेंबर, मंगळवार : सुप्रसिद्ध बॉलीवूड सिनेतारका, ड्रीमगर्ल, हेमामालिनी यांचा राधा कृष्ण लीला दर्शवणारी शास्त्रीय नृत्याद्वारे विशेष प्रस्तुती.११ सप्टेंबर, बुधवार : महाराष्ट्राची संस्कृती अंतर्गत या अभिनेत्री मानसी नाईक, माधुरी पवार, मीरा जोशी, हेमलता बने, ऐश्वर्या बदडे यांचा संगीतमय कार्यक्रम.१२ सप्टेंबर, गुरुवार : इंडियाज गॉट टॅलेंट फेम क्रेझी हॉपर्स ग्रुप आग्रा यांचा नृत्य थरार व हिंदवी पाटील व प्राजक्ता गायकवाड लावणी यांची जुगलबंदी.१३ सप्टेंबर, शुक्रवार : चला हवा येऊ द्या सहभाग – स्मिता गोंदकर, जुई बेंडकले, हेमांगी कवी, सागर करंडे, भारत गणेशपुरे, कुशल बद्रिके, गौरव मोरे, श्रेया बुगडे व इतर १४ सप्टेंबर, शनिवार : महाराष्ट्राची हास्य जत्रा सहभाग – समीर चौगुले, पृथ्वीक प्रताप, नम्रता संभेराव, वनिता खरात, प्रसाद खांडेकर, शिवाली परब, चेतना भट व इतर.१५ सप्टेंबर, रविवार : अजय अतुल लाईव्ह, जगप्रसिद्ध गायक, गीतकार व संगीतकार अजय व अतुल गोगावले यांचा ५० कलाकारांच्या संचासह लाईव्ह गीतांचा कार्यक्रम. १६ सप्टेंबर, सोमवार – प्रसिद्ध गायक आनंद शिंदे व टीमचा भीमगीतांचा खास कार्यक्रम. दरम्यान या गणेश महोत्सवाच्या निमित्ताने धनंजय मुंडे साहेब यांच्या संकल्पनेतून परळी वासियांना तसेच बीड जिल्ह्यातील गणेश भक्तांना सांस्कृतिक कार्यक्रमांची मोठी मेजवानी अनुभवास मिळणार असून या गणेश महोत्सवात जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे व कार्यक्रमांचा आनंद घ्यावा, असे आवाहन ज्येष्ठ नेते तथा नाथ प्रतिष्ठानचे कार्यवाह वाल्मीक अण्णा कराड यांनी केले आहे.

## पान सहा वरून

### केज रोटरी करणार शिक्षकांचा

कार्य करणाऱ्या शिक्षकांची समाज व शासन योग्य ती दखल घेत नाही. लोकप्रतिनिधी अनेकवेळा शासकीय पुरस्कारासाठी आपल्या मर्जीतील व हितसंबंधांतील लोकांचीच नावे अधिकतर शासकीय पुरस्कारासाठी शिफारस करतात अशा वेळी खरे कर्तव्यदक्ष व सेवेशी निष्ठावान असलेले शिक्षक सन्मानापासून दुर्लक्षित राहतात. तरीही त्यांचे कार्य अविरतपणे सुरूच असते. केज तालुक्यातील अशा लोकांची दखल घेण्याचे केज रोटरीने ठरवले आहे.'रोटरी इंटरनॅशनल' ही एक जगातील सर्वात मोठी 'जागतिक सामाजिक संस्था' असून या संस्थेच्या पुरस्काराची सामाजिक व प्रशासकीय पातळीवर खूप मोठी प्रतिष्ठा आहे. या संस्थेचे पुरस्कारही योग्य व पात्र अशा व्यक्तीलाच दिले जातात.वर्ष २०२४ साठी केज तालुक्यातील जिल्हा परिषद शिक्षण सेवेअंतर्गत प्राथमिक व माध्यमिक सेवा देणाऱ्या दहा शिक्षकांसाठीचे नेशन बिल्डर अवॉर्ड अर्थात राष्ट्र उभारणी शिल्पकार पुरस्कार घोषित केले असून या पुरस्काराचे मानकरी संदेश अंबादास फावडे ,अशोक अनंतराव जोगदंड ,मुल्ला समद बशीर साब ,अनंत नानाभाऊ जाधवर ,श्रीकृष्ण लक्ष्मणराव सिरसट , प्रशांत लक्ष्मणराव जाधव ,गीता जीवराज अंडिल ,वैशाली शंकरराव धाडवे ,वैशाली कारभारी बोराडे ,स्वाती वामनराव समुद्रे हे आहेत. या पुरस्काराची निवड समितीने केज तालुक्यातील जिल्हा परिषद शिक्षकांच्या कार्याचा आढावा घेऊन केली असून हे पुरस्कार दरवर्षी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या नवीन शिक्षकांना देण्यात येणार आहेत. निवड प्रक्रियेत हनुमंत भोसले, प्रवीण देशपांडे, दादा जमाले, अरुण अंजाण, श्रीराम देशमुख व प्रा डॉ बीजे हिरवे या सदस्यांनी सहकार्य केले. या पुरस्कारांचे वितरण मराठवाडा मुक्तीसंग्रामदिनाचे औचित्य बाळगून १७ सप्टेंबर २४ रोजी सायंकाळी करण्यात येणार असल्याची माहिती केज रोटरीचे विद्यमान अध्यक्ष प्रकाश कामाजी, सचिव अनंत तरकसबंद यांनी दिली आहे.

### उल्लेखननिय कार्य अन् अध्यापनाची

महाविद्यालय समाजशास्त्र परिषदेचे राज्याध्यक्ष आहेत. विकास आणि परिवर्तनाच्या प्रक्रियेत अजिंठा डोंगर परिसरातील भिल्ल जमात या विषयावर समाजशास्त्र विषयात संशोधन कार्य केले आहे. मासिके व दैनिकातून ते प्रासंगिक, परीक्षणात्मक आणि विश्लेषणात्मक लेख लिहितात. विविध विषयांवर त्यांचे संशोधन पेपर प्रकाशित झाले आहेत, कन्नड आणि परिसरात अनेक विषयावर त्यांनी शेकडो व्याख्याने दिली आहेत, अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या माध्यमातूनही त्यांनी प्रबोधन केले आहे, महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती आणि संशोधन मंडळ,पुणे बालभारती येथे समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे ते सदस्य म्हणून कार्यरत आहेत. या सर्व शैक्षणिक,सामाजिक कार्य आणि योगदानाची दखल घेत. नागरी विकास सेवाभावी संस्था, छत्रपती संभाजीनगर यांनी डॉ. प्रकाश खेत्री यांना राज्यस्तरीय सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षक पुरस्कार ,२०२४ देऊन सन्मान केला आहे.सन्मान व पुरस्कार मिळालाबद्दल डॉ.भीमराव आंबेडकर कनिष्ठ महाविद्यालयाचे अध्यक्ष डॉ. ए. के.महाले, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ .विजय भोसले, उपप्राचार्य डॉ.बी.के. मगर उपप्राचार्य प्रा. अभय आहेर व मोठेवाडी येथील मित्र परिवार यांनी अभिनंदन केले आहे.

### पांढरवाडी खूनातील

होता ही घटना (दि ३ सप्टेंबर) रोजी चार च्या दरम्यान घडली होती तलवाडा पोलिसांनी सदर घटनेतील सुत्रधार अमोल सुखदेव भावले व त्यांचा भाऊ उमाजी भावले यांना पुण्यातील पिंपरी चिंचवड पुणे परिसरातून दिं.५/ रोजी दुपारी पाठलाग करुन बेड्या ठोकल्या आहेत गेवराई न्यायालयात आरोपींना हजर केले असता न्यायालयाने पाच दिवसांची सुनावली पोलिस कोठडी सदरची कार्यवाई बीड पोलिस अधीक्षक अविनाश बारगळ, अप्पर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर, उप विभागीय पोलिस अधीकारी नीरज राजगूरू, यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि सोमनाथ नरके, पथकं प्रमुख पोउपनि स्वापनिल कोळी, पोउपनि संदिप नेवरे, पोह खाडे, पोह जावळे ,यांनी कामगिरी केली आहे.

### नुकसान झाले, निकस

त्यांनी म्हटले आहे की ,माजलगांव, वडवणी व धारुर तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे खरीप हंगाम २०२४ -२५ मध्ये दिनांक ३१ ऑगस्ट २०२४ ते दिनांक ३ सप्टेंबर २०२४ दरम्यान सोयाबीन कापुस, तुर व समिश्र पिकाचे आतोनात नुकसान झाले आहे व ढगफुटी सदृश्य पाऊस झाला त्यामुळे शेतक-याचे पिक काढणीला आलेले. असताना त्यांचे अतिवृष्टीमुळे शंभर टक्के नुकसान झालेले आहे त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. त्याकरीता शासनाने पंचनामे न करता सरसगट अर्थिक मदत देण्यात यावी. व पिक विमा तातडीणे देण्यात यावा.अशी मागणी भाजपा नेते रमेश आडसकर यांनी काल दिलेल्या निवेदनात केली आहे काल त्यांनी प्रत्यक्ष शेतातील पाहणी करते वेळी त्यांच्या समवेत बबनराव बप्पा सोळंके, शहराध्यक्ष,अँड. सुरेशराव दळवे, अनंतराव शेंडगे,,खयुम भाई पठान, दिलीप नाना सोळंके, नितीन डुकरे, विष्णुपंत आगे, बाबासाहेब आगे, गणु मामा सोळंके, जयपाल भिसे, अनंत जगताप, प्रमोद शेजुळ, संतोष जाधव, विश्वनाथ आबा आगे आजुभाई, बाबासाहेब भाउ आगे, छबन घाडगे,व सर्व सहकारी.उपस्थित होते

### उत्कृष्ट देखावा मंडळास

समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीमध्ये प्रा.लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, व्यंकटेश वैष्णव, प्रा.संजय पाटील देवळाणकर, प्रा.सारंग वाघमारे, फामजी पारीख, विद्याभूषण बेदरकर यांचा समावेश आहे. या स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या मंडळांनी नोंदणीसाठी श्रीमंत तोंडे ८३२९२५९२९५ व नागेश शेटे ७०५७०२६८७७ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

### कोणत्याही अटी न लावता

शेतकऱ्याच्या माथे मारीत असल्यामुळे शेतकरी चारही बाजूने आर्थिक संकटात सापडले आहे . कृषी खाते झोपलेले आहे कारण कृषी खात्यातील सर्वांच जबाबदार अधिकारी कर्मचारी मंत्री कार्यालय यांना बोगस कंपन्या मार्फत टक्केवारी मिळत असल्यामुळे कारवाई केली जात नाही असा गंभीर आरोप काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी केला . शेतकऱ्याला शासनाची साथ नाही तर निसर्गाची साथ नाही तरी ही शेतकरी स्वतःच्या कष्टाने मेहनत करून उत्पन्न शेतीतून काढून राज्यातील व देशातील जनतेला अन्नधान्य भाजीपाला दूध व इतर सर्व शेतीतील साहित्य पुरवतो तरीही शासन याची दखल घेत नाही हे खरे शेतकऱ्याचे दुर्दैव आहे. मराठवाडा व विदर्भात खूप मोठ्या प्रमाणावर ८० ते ८५ टक्के शेती ही सोयाबीन कापूस तूर मूग उडीद मका बाजरी पिवळा ही पिके घेतली जातात. अतिवृष्टी मुसळधार ढगफुटीमुळे हाती आलेले पिके वाया गेलेले असून सर्व बाजूने शासनाने नियमात बसून पंचनामे करून एनडीआरएफ व एसडीआरएफ च्या निकष च्या अटी न घालता प्रतिहेक्टरी ५० हजार रुपये आर्थिक मदत तात्काळ देण्यासंदर्भात मंत्रिमंडळाच्या बैठकीत बहुमताने ठराव मंजूर करून शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे वर्ग करण्याची मागणी काँग्रेसचे नेते वसंत मुंडेंनी केली.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com

Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# कब्रस्तानच्या जागेवर झाले अतिक्रमण!

बोंबला

## जिल्हा कार्यालयाच्या आदेशाला केराची टोपली!



तलवाडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील कब्रस्तानच्या जागेवर मुस्लिम समाजाच्याच काही लोकांनी अतिक्रमण केलेले आहे. या संदर्भात गावातील लोकांनी हे अतिक्रमण उठविण्याच्या मागणीसाठी गेल्या काही वर्षापासून वक्फ बोर्ड आणि जिल्हा प्रशासनाकडे वेळोवेळी पाठपुरावा केलेला आहे. या प्रकरणात बीड जिल्हाधिकाऱ्यांसह वक्फच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी अतिक्रमण हटविण्यासाठी १६ नोव्हेंबर २०२२ मध्ये पत्र दिलेले आहे. तरीही गेवराईचे तहसिलदार अजुन कोणतीच कार्यवाही करीत नाहीत. तहसिलदार खोमने साहेब गेल्या अनेक वर्षापासून हा लढा सुरु आहे. आणखी किती वर्ष टाळाटाळ करायची? असा प्रश्न उपस्थित करत तलवाड्यातील ग्रामस्थांनी दि. १० सप्टेंबर पासून गेवराई तहसिलसमोर कुटुंबियांसह उपोषणाचा इशारा दिला आहे.

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील ग्रामस्थांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मौजे तलवाडा येथील गट नंबर ५१० मधीलल कब्रस्तान तसेच दुसरे लहान मुलांचे कब्रस्तान आहे. त्या ठिकाणी मुस्लिम समाजातीलच काही लोकांनी अतिक्रमण केलेले आहे. सदरील अतिक्रमण हटवावे, या मागणीसाठी तलवाड्यातील ग्रामस्थांनी प्रशासनाकडे वेळोवेळी तक्रारी केलेल्या आहेत. त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, गेवराई तहसिलदार यांना या बाबत आदेशही झालेले आहेत. दोन्ही कब्रस्तान तहसिलदार यांनी मंडळ अधिकारी व तलाठी पाठवून पंचनाम्याचे आदेश झाले होते. १७ मे २०२२ रोजीमंडळ अधिकारी व तलाठ्यांनी प्रत्यक्ष जायमोक्यावर भेट देऊन पाहणी पंचनामा करुन गेवराई तहसिलला अहवाल दाखल केलेला आहे. उपअधीक्षक भूमी अभिलेख गेवराई यांना तहसिलदारांना गट नंबर ५१० ची हद्दबंदी करुन मोजणी करुन तो अहवाल देखील तहसिल कार्यालयात दाखल करण्याचे आदेशित केलेले होते. हे दोन्ही अहवाल तहसिलला सादर झालेले आहेत, तरीही गेवराईचे तहसिलदार संदीप खोमने हे तलवाड्यातील क्रबस्तानच्या जागेवर झालेले अतिक्रमण काढण्यास टाळाटाळ करीत आहेत. अतिक्रमण न काढल्यास दि.१० सप्टेंबरपासून तलवाड्यातील ५०० ते ६०० मुस्लिम बांधव कुटुंबियांसह गेवराई तहसिल कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करणार असल्याचा इशारा निवेदनातून दिला आहे. निवेदनावर शेख मुखीद शेख अब्दुल, शेख जलील शेख दगड्डु, खतीब मोमीन अ.मुखीद, शेख अब्दुल रहीम खैरोद्दीन, शेख सिराज शेख नसीर आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत. तलवाड्यातील या उपोषणाला एमआयएम व जमिअत उलेमा-ए-महाराष्ट्र बीड शाखेने पाठिंबा दिला आहे.

# चोर पकडून धुलाई करुन पोलीसांच्या हवाली !

सतर्कता: ड्रोन व चोरांच्या भीतीने ग्रामस्थ भयभीत



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील कानडी येथील घटना केज तालुक्यात गेल्या आठ-दहा दिवसापासून चोरांचा सुळसुळाट चालू आहे. गेल्या अनेक दिवसापासून रात्रीच्या वेळी ड्रोन प्रत्येक गावातून फिरत होते त्या मुळे गावातील नागरिक भयभीत झाले होते. गावातील नागरिक आपआपल्या गावात गस्त घालत होते त्याच वेळेस कानडी माळी गावात रात्रीच्या वेळी ड्रोन दिसले व कांही वेळेत एक संशयित स्कॉर्पिओ गाडी कानडीच्या बस स्टँडवर आली त्याला गावकऱ्यांनी वेढा देऊन विचारपूस केली असता उडवाउडवीची उत्तरे देऊ लागले गावकऱ्यांनी गाडीची झडती घेतली असता त्यात हत्यारे दिसून आली त्यामुळे गावकऱ्यांनी चोरानां चांगलाच चोप दिला व पोलीसांना कळवले चोर हे चार चाकी गाडी क्रमांक एम एच ४५ ऐ.२४२१ आले होते.पोलीसांनी स्कॉर्पिओ गाडीसह ३ जणांना ताब्यात घेतले आहे. त्यात ,राहुल काळे, वय १८रा सरमकुंडी,श्रावण महादेव काळे, वय २० रा. केवड ,आमोल सटवा घुले वय २१ रा कोठरबन, चौथा फरार आरोपी अशोक मिसाळ, कोल्हेवाडी असे त्यांचे नाव आहेत त्यांच्याजवळील तलवार छुरा इतर शस्त्र जप्त करण्यात आले आहे. सदर घटनेची माहिती गावकऱ्यांनी केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांना कळवताच त्यांनी त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक आनंद शिंदे राजू वाघमारे चंद्रकांत काळकुटे नितीन जाधव होमगार्ड बाळू थोरात विजय वनवे हे तात्काळ घटनास्थळी दाखल होऊन सदर चोरास ताब्यात घेतले. त्यांनी उपचार साठी उपजिल्हा रुग्णालयात पाटवण्यात आले पोलीस प्रशासन पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अनंद शिंदें करीत आहेत.

# विभागीय नियंत्रक थेट ग्रामीण भागात

कुतूहल: जरंडीला प्रवाशांशी साधला




सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

प्रवाशी दिनानिमित्त शुक्रवारी दुपारी दोन वाजता अचानक छत्रपती संभाजीनगर चे परिवहनचे विभागीय नियंत्रक सचिन क्षीरसागर यांनी सोयगाव-बनोटी रस्त्यावरील गावांना भेटी देऊन बस स्थानकावर बसलेल्या प्रवाशासोबत संवाद साधून प्रवाशांची एस टी बद्दल भूमिका जाणून घेत प्रवाशांना येणाऱ्या अडचणी समजून घेतल्या जरंडी बस स्थानकात तीन तास थांबून त्यांनी प्रवाशांसोबत चर्चा केली यावेळी त्यांनी आदर्श जरंडी गावाच्या विकास कामांचीही पाहणी केली

प्रवाशी दिनानिमित्त एस टी चे विभागीय नियंत्रक सचिन क्षीरसागर यांनी शुक्रवारी दुपारी अचानक सोयगाव बनोटी रस्त्यावर दौरा करत संवाद साधला यावेळी त्यांनी सोयगाव बनोटी रस्त्यावर उत्पन्नचा अंदाज घेत या मार्गावर अतिरिक्त बस फेऱ्या सुरू करण्याचे आश्वासन प्रवाशांना दिले गणेशोत्सव काळात जिल्ह्यात सर्वच आगाराच्या बसेस कोकण मुंबई कडे रवाना झालेल्या आहे त्यामुळे जिल्ह्यात सर्वच आगारात बसेस चा तुटवडा भासणार असून प्रवाशांनी परिवहनला सहकार्य करावे असे आवाहन केले दरम्यान सोयगाव आगारात नवीन वीस बसेस दाखल होणार आहे त्यामुळे आता सोयगाव आगरातून ग्रामीण बस फेऱ्या सह लांब पल्ल्याच्याही बसेस धावतील असे सांगून सोयगाव आगारात मनुष्यबळ कमी आहे याबाबत ही विचाराधीन आहे यावेळी एस टी चे कर्मचारी विनायक आंबट ,माजी पंचायत समिती सदस्य संजीवन सोनवणे,दिलीप पाटील उपसरपंच संजय पाटील सुधीर कुलकर्णी आबासाहेब बावस्कर विजय चौधरी संतोष कुमार पाटील आदींची त्यांच्या सोबत उपस्थिती होती.



# चळवळीच्या कार्याची घेतली दखल!

निवड : रिपाइंच्या तालुकाध्यक्षपदी भरत पगारे

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

येथील सामाजिक कार्यकर्ते भरत पगारे यांची रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या (राष्ट्रिय अध्यक्ष राजरत्न आंबेडकर) सोयगाव तालुका अध्यक्षपदी प्रदेश अध्यक्ष दिनेश हनुमंते यांनी रविवारी (दी.१) नियुक्ती केली आहे.छत्रपती संभाजीनगर सुभेदारी विश्रगृह येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया पक्षा प्रवेश सोहळा घेण्यात आला. यात मोठ्या प्रमाणात विविध पक्षातील कार्यकर्त्यांनी आर पी आय पक्षात प्रवेश घेतला.

यावेळी सोयगाव तालुका अध्यक्ष म्हणून भरत पगारे यांची सर्वानुमते नियुक्ती करण्यात आली. त्यांना प्रदेश अध्यक्ष दिनेश हनुमंते यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात येऊन पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या.यावेळी प्रदेश उपाध्यक्ष सिद्धार्थ गायकवाड, प्रदेश सचिव वैभव धबडगे, मराठवाडा कार्याध्यक्ष मिलिंद मोकळे, महिला उपाध्यक्ष सुवर्णताई कांबळे, मराठवाडा प्रवक्ता पवन पाखरे, संभाजीनगर जिल्हा प्रभारी विलास गंगाधर पगारे, संभाजीनगर पूर्व जिल्हा अध्यक्ष शिवाजी बागुल, शहर अध्यक्ष राहुल जाधव यांच्यासह कार्यकर्त्यांची मोठ्ठा संख्येनी उपस्थिती होती.

# वैद्यकिय शिक्षणासाठी मिळाला प्रवेश

अभिनंदनिय:विद्यार्थ्यांचा प्रा.विजयकुमार देशमुखांच्या हस्ते सत्कार



परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

सप्टेंबर २०२४ रोजी परळीतील सामाजिक कार्यकर्ते प्रा.विजयकुमार देशमुख यांच्या हस्ते त्यांच्या निवासस्थानी वैद्यकिय महाविद्यालयात प्रवेश मिळविल्याबद्दल दोन गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.विलास आदोड यांची मुलगी कु.अनिशा हिने एस.सी. कॅटेगिरी मधून मेडिकल साठी प्रवेश मिळवित तिने या परीक्षेत ५७२ गुण घेतले असून तिला एस.आर.टी.मेडिकल कॉलेज अंबाजोगाई येथे प्रवेश मिळविला आहे. तर श्रीमती कृष्णाबाई देशमुख शाळेतील शिक्षक अमोल भानुदास गुढे सर यांच्या रितेश अमोल गुढे या मुलाने ओपन मधूनच मेडिकलला प्रवेश मिळविला आहे. त्याचाही यावेळी सत्कार करण्यात आला.

माणिकभाऊ मुंडे यांच्या हस्ते त्याचाही सत्कार करण्यात आला. तर कु.अनिशाचा सौ.आशा विजयकुमार देशमुख यांनी सत्कार केला. या कार्यक्रमास अनेक मान्यवर उपस्थित होते. त्यात रेपे साहेब, जे.टी.महाजन सर, विलासराव आदोडे, आटोळकर, प्रकाश शिंदे अशोक शिंदे, महादेव हुंडेकर आर.एम.कांबळे, राहुल जगतकर, राहुल ताटे आदी उपस्थित होते.

# शेतकऱ्याचा मुलगा झाला आरोग्य सेवक



गंगामसला/पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील मोठेवाडी येथील अशोक बबनराव राऊत यांची पुणे जिल्हा परिषद आरोग्य सेवक पदी निवड झाली आहे, अतिशय सर्वसामान्य घरातील शेतकरी कुटुंबातील विद्यार्थी आरोग्य सेवक झाला, जिद्द चिकाटी मेहनत संघर्ष असेल तर अशक्य गोष्टी जीवनात शक्य करता येतात, त्याचे हे ज्वलंत उदाहरण आहे.

नुकत्याच शासनाने केलेल्या सरळ सेवा भरती प्रक्रियेतील आरोग्य सेवक पदासाठी ची पुणे जिल्ह्यातील परीक्षा अशोक राऊत यांनी दिली होती आणि त्यामध्ये ते यशस्वी झाले आहेत, त्यांच्या या निवडी बद्दल डॉ.भानुदास रासवे,संभाजी पास्टे, राहुल सुरवसे,अशोक रासवे,नितीन जाधव,आदित्य गोंडे,दशरथ खेत्री व मित्र परिवार यांनी अभिनंदन केले आहे.

# तहसिलदार हल्ल्यातील आरोपीला कोठडी!

## सपोनि संतोष जंजाळांनी शिताफिने केली अटक


गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

गत दोन महिण्यापुर्वी गेवराईचे तहसिलदार संदिप खोमणे हे गस्त घालत असतांना त्यांनी एक हायवा पकडला तसेच हा हायवा सोडून घेण्यासाठी तहसिलदार यांच्या पथकावर जावेद पठाण यांने हल्ला चढविला होता. दि ४ सप्टेंबर रोजी जावेद पठाण हा पाडळसिंगी शिवारात असल्याची माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष जंजाळ यांना मिळाल्यानंतर त्या ठिकाणी दाखल होऊन जावेद पठाण याला ताब्यात घेतले होते न्यायालयात हजर केले असता त्याला दोन दिवस पोलीस कोठडी देण्यात आली होती. आता या आरोपी जावेद पठाणला १४ दिवसाची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.

याबाबद सविस्तर माहिती अशी की, (दि २५ जून ) रोजी रात्री अकराच्या दरम्यान गेवराईचे तहसिलदार संदिप खोमणे हे आपल्या पथकासोबत वाळू तस्करी रोखण्याच्या उद्देशाने गस्त घालत असतांना गेवराई बायपास दत्तराज पार्क जवळ एक हायवा कार्यवाईसाठी अडविला परंतू जावेद पठाण यांने आपल्या बारा ते तेरा साथीदार यांना सोबत घेऊन तहसिलदार संदिप खोमणे यांच्यावर जिवघेन्ना हल्ला चढविला तसेच या प्रकरणी गेवराई पोलिसांत गून्हा दाखल करण्यात आला होता. आरोपी जावेद पठाण याने बीड जिल्हा सत्र न्यायालयात अटकपुर्व जामिनासाठी अर्ज केला होता परंतू त्यांचा जामिन न्यायालयाने फेटाळला होता. दि ४ सप्टेंबर रोजी सकाळी च्या सात वाजण्याच्या सुमारास आरोपी जावेद पठाण हा पाडळसिंगी शिवारात आहे अशी माहिती गूप्त बातमी दाराने सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष जंजाळ यांना दिली त्यांनी पोलीस हवालदार जितेंद्र ओव्हाळ व संजय सोनवणे यांना सोबत घेऊन मोठ्या शिताफिने जावेद पठाण च्या मुसक्या आवळल्या. त्याकडून एक काळ्या रंगाची स्कॉर्पिओ, हायवा ट्रक, लाकडी दांडे, लोखंडी रॉड जप्त करण्यात आले होते तसेच त्याला न्यायालयाने दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली होती. आज दिनांक सहा सप्टेंबर रोजी गेवराई न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने १४ दिवसाची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. ही कारवाई पोलीस उपविभागीय अधिकारी नीरज राजगुरू, पोलीस निरीक्षक प्रवीण कुमार बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष जंजाळ, पोलीस हवालदार जितेंद्र ओहोळ, संजय सोनवणे यांनी केली आहे.

# सोयगाव शहरात पाणी पुरवठा ठप्प!

संकट: सोना नदीच्या पूरात पाईपलाईन वाहून गेली



सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी


रविवारी रात्री सोयगाव शहरातील सोना नदीला आलेल्या पुरात नगर पंचायतची शहराला पाणी पुरवठा करणारी पाईपलाईन च वाहून गेल्यामुळे शहरातील पाणी पुरवठा पाच दिवसापासून ठप्प झाला आहे दरम्यान शुक्रवारी या पाईपलाईनचे दुरुस्ती चे काम नगरपंचायतने हाती घेतले होते परंतु दुरुस्ती पूर्ण झाली नसल्याने गणेशोत्सव च्या पहिल्याच दिवशी सोयगाव करांना पाणी टंचाईला तोंड द्यावे लागणार आहे

शहराला वेताळवाडीच्या धरणातून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होतो त्यामुळे वेताळवाडी धरणावर सोयगाव नगर पंचायतची पाणी पुरवठा यंत्रणा आहे या पुरवठा यंत्रणेची शहरात जाणारी भूमिगत पाईपलाईन सोना नदीच्या पात्रातून गेली आहे या नदीला रविवारी झालेल्या अतिवृष्टीमुळे मोठा पूर आला होता या पूराच्या पाण्यात शहराची पाणी पुरवठा करणारी भूमिगत पाईपलाईन वाहुन गेली आहे त्यामुळे पाच दिवसापासून शहरात निर्जली आहे

परंपरा

## घरगुती तयारीची लगबग सुरू

# सण-उत्सवामुळे बाजारपेठ उफलली!



कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

गणेशोत्सव व गौराई आगमनाच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठेमध्ये उत्साहाचे वातावरण झाले आहे. मंडळांसह घरगुती गणेशोत्सवाच्या तयारीची लगबग सुरू झाली असून, सजावटीच्या विविध आकर्षक साहित्याने कड्याची बाजारपेठ सध्या सजली आहे. बाजारपेठेत विविध आकर्षक साहित्यांची रेलचेल पाहायला मिळत असून खरेदीसाठी गणेशभक्तांची झुंबड उडाली आहे.

आज शनिवार दि. ७ सप्टेंबर पासून विघ्नहर्ता गणपती बाप्पांचे वाजतगाजत मोठ्या उत्साहात आगमन होणार आहे. त्यामुळे कड्याच्या बाजारात गणेशोत्सवासाठी लागणाऱ्या विविध आकर्षक साहित्यांची रेलचल वाढली आहे. गणेशासमोर सजावटीसाठी वापरण्यात येणाऱ्या एलईडीच्या विद्युत माळा, फुलांच्या माळा, विविध प्रकारचे रंगबेरंगी फोकस, फॉगलाईट, झुंबर, गणेश मखर, गौरी मंडप, गौराईचे साहित्य, आकर्षक सुबक गणेश मूर्ती, मंडप, गणेशासन, फुलहार आकर्षक पडदे, शो - लटकत, कागदी फुलांच्या माळा, तोरण, फुलदाणी, सुगंधित अगरबत्ती, धूप चंदन हार, आदी पूजेचे साहित्य, डेकोरेशन, यासह अन्य इलेक्ट्रॉनिक्स साहित्यामुळे आदी साहित्यामुळे कड्याची बाजारपेठ सजली असून, हे चित्र पाहून गणेश भक्तांचे डोळे दिपून जात आहेत. काही साहित्यांच्या किमतीत यंदा वाढ झाल्यामुळे ग्राहकांच्या खिशाला आता कात्री लागणार आहे.

### अवघ्या 'एक रुपया' नफा अन् 'गणेश मूर्ती'

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सजावटीसाठी लागणाऱ्या आकर्षक साहित्याने कड्याची बाजारपेठ सजली आहे. येथील गणेश मूर्ती विक्रेते धनंजय मुथ्था यांनी मागील दोन वर्षापासून 'ना नफा ना तोटा' या तत्त्वावर मूर्तींच्या खरेदी किंमतीवर अवघा एक रुपया नफा कमवून गणेशाच्या मूर्तीची विक्री करीत आहेत. गणेश मूर्तींच्या किंमतीत कुठलाही नफा कमवायचा नाही. असा संकल्प केला असल्याचे मुथ्था यांनी सांगितले.

# परळीत अनेकांचे संसार पाण्यात

प्रा.सुषमाताई अंधारे :नामदार साहेब त्यांना मदत करा



परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

परळीत नुकत्याच झालेल्या पुराच्या पाण्यात अनेकांचे संसार पाण्यात वाहून गेले आहेत नामदार साहेब त्यांना मदत करा असा खोचक टोला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या नेत्या प्रा सुषमाताई अंधारे यांनी पालकमंत्री नामदार धनंजय मुंडे यांना लगावला. त्या आज परळी येथील पुरग्रस्त भागातील नागरिकांच्या गाठीभेटी घेताना बोलत होत्या.

यावेळी प्रा सुषमा अंधारे यांनी पुराच्या पाण्यामुळे नागरिकांच्या घरात पाणी शिरल्याने अनेकांचे संसारोपयोगी साहित्य नष्ट झाले. तसेच अनेकांची घरातील अन्नधान्य व इतर वस्तू वाहून गेल्या त्याची पाहणी करत होत्या .

दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी


# अहमदनगर जिल्ह्याच्या नामांतराचा मार्ग सुकर

### अहिल्यानगर नावास रेल्वे मंत्रालयाची नाहरकत : राधाकृष्ण विखे

देशोन्नती वृत्तसंकलन



**नगर :** अहमदनगर जिल्ह्याला अहिल्यानगर नाव देण्यास केंद्रीय रेल्वे मंत्रालयाने हिरवा कंदिल दिला असून, हे नाव देण्यास विभागाची कोणतीही हरकत नसल्याचे पत्र दिल्याने जिल्ह्याच्या नामांतराचा मार्ग सुकर झाला असल्याचे महसूल तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सांगितले.

जिल्ह्याला पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे नाव देण्याची मागणी झाल्यानंतर राज्यातील महायुती सरकारने अहिल्यानगर असे नाव देण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला. नामांतराच्या बाबतीतील सर्व प्रक्रीया ही केंद्र सरकारच्या अखत्यारीत पूर्ण होत असल्याने प्रत्येक विभागाची ना हरकत आवश्यक असते.

केंद्रीय रेल्वे मंत्रालयाने नामांतराच्या बाबतीत हरकत नसल्याचे पत्र जारी करुन, अहिल्यानगर नावास मान्यता दिली आहे. या नावाचे कोणतेही रेल्वेस्थानक देशात नसल्याचेही त्यांनी आपल्या पत्रात नमुद केल्याने जिल्ह्याला अहिल्यानगर नाव देण्यातील पहिला टप्पा पूर्ण होत असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले.





◆ रेस्कू ऑपरेशन करीत वनविभागाने केले जेरबंद
◆ परिसरात प्रचंड दहशतीचे वातावरण

# भर वस्तीत घुसला बिबट्या

देशोन्नती वृत्तसंकलन

**चंद्रपूर :** ऐरवी जंगलालगत असलेल्या गावांमध्ये बिबट, वाघ, अस्वल यासारखे हिंस्त्र वन्यजीवांचा वावर असल्याचे आपन नेहमीच ऐकत असतो मात्र आज गुरूवार (दि.५) सप्टेंबरला भल्या सकाळीच चंद्रपूर सारख्या अत्यंत गजबजलेल्या लोकवस्तीत चक्क बिबट शिरल्याने परिसरात प्रचंड दहशत पसरली. बिबट शहरातील बिनबा गेट जवळील बाबडे नामक व्यक्तीच्या घराजवळील असलेल्या झाडीझुडपात लपून बसल्याची माहिती वाऱ्यासारखी शहरात पसरताच बिबट बघण्यासाठी नागरिकांनी तोबा गर्दी गेली. दरम्यान नागरिकांनी वनविभागाला माहिती देताच वनविभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाल. वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी अथक प्रयत्नांनी दुपारी बिबट्याला बेशुध्द करून जेरबंद केले.

प्राप्त माहितीनुसार, आज सकाळी पहाटेच्या सुमारास बिनबा गेट जवळील बोबडे यांच्या घराजवळ असलेल्या झाडीझुडपात बिबट फिरत असल्याचे नागरिकांनी बघीतले. त्या बिबट्याचा मागे कुत्रे लागल्याने त्याने पळ काढत थेट बिनबा गेट जवळील बोबडे यांच्या घराच्या बाजूला असलेल्या झुडपात आश्रय घेतला. सदर बाब नागरिकांना कळताच याबाबत त्यांनी तात्काळ वनविभागाला माहिती दिली. वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी बिबट्याला पकडण्यासाठी घटनास्थळी दाखल झाले. दरम्यान या घटनेची माहिती मिळताच चंद्रपूरचे आमदार किशोर जोरगेवार ऑन द स्पॉट दाखल झाले. स्वतः आमदार तब्बल पाच तास घटनास्थळी थांबून सर्व परिस्थितीवर लक्ष ठेवून होते. येथे जमलेली गर्दी पाहता, सुरक्षा वाढविण्याच्या सूचना त्यांनी केल्या असून, बिबट्या जेरबंद करण्याचे निर्देश दिले होते.

### दंगा नियंत्रण पथकही घटनास्थळी दाखल

विभागीय एसीएफ आदेश शेणगे, विभागीय वन अधिकारी प्रशांत खाडे, वन परिक्षेत्र अधिकारी नायगमकर यांच्यासह पोलिस विभागातील अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. रेस्क्यू पथकही येथे दाखल झाले. इको-प्रोचे बंडू धोतरे व त्यांची टिमही घटनास्थळी दाखल होऊन वनविभागाला सहकार्य करीत होती. येथे होत असलेली नागरिकांची गर्दी पाहता दंगा नियंत्रण पथकालाही पाचारण करण्यात आले. तहसीलदार आणि वन विभागाचे अधिकाऱ्यांनी समन्वयाने परिस्थितीवर नियंत्रण ठेवित दुपारी बिबट्याला जेरबंद करण्यात यश मिळविले.

# अमित ठाकरेंनी रुग्णालयात जात घेतली देविदास खेडकर यांची भेट

देशोन्नती वृत्तसंकलन



**नगर :** महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे अध्यक्ष अमित ठाकरे हे नगर जिल्हा दौऱ्यावर आले असताना त्यांनी आपल्या व्यस्त कार्यक्रमात सध्या कॅन्सर या आजाराने उपचार घेत असलेले मनसे जिल्हाध्यक्ष देविदास खेडकर यांची रुग्णालयात जात भेट घेऊन तब्येतीची विचारपूस केली. अमित ठाकरे बुधवारी नगर शहरात आले होते. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील पदाधिकारी, कार्यकर्त्यांचा मेळावा आणि बैठकांचे आयोजन अमित ठाकरे यांच्या उपस्थितीत करण्यात आले होते. यादरम्यान त्यांना जिल्हाध्यक्ष असलेले देविदास खेडकर हे कॅन्सर ग्रस्त असून उपचार घेत असल्याची माहिती मिळाली. यानंतर त्यांनी आपल्या व्यस्त कार्यक्रमात वेळ काढत रुग्णालयामध्ये जाऊन खेडकर यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी खेडकर आणि त्यांच्या कुटुंबीयांशी चर्चा करून मनसे पक्ष खेडकर यांच्यासोबत असल्याचे सांगत लागेल ती मदत खेडकर यांना करेल असं अश्वस्थ केले. या निमित्ताने अमित ठाकरे यांनी एक कुटुंबप्रमुख या नात्याने घेतलेली भेट मोठी दिलासा देणारी आणि कॅन्सर सारख्या आजाराला नव्या धीराने तोंड देत पुन्हा एकदा पक्षासाठी काम करण्याची जिद्द देणारी असल्याची भावना देविदास खेडकर यांनी व्यक्त केली आहे.

## बंदोबस्त टाळण्यासाठी केले जवानाने बेपत्ता होण्याचे सोंग

**नागपूर :** काही दिवसांअगोदर मध्यवर्ती रेल्वे स्थानकाहून बेपत्ता झालेल्या जवानाचा शोध लोहमार्ग पोलिसांनी घेतला. जम्मू काश्मीरचा बंदोबस्त टाळण्यासाठी सीआरपीएफ जवानाने युक्ती नागपूरात तुकडी आल्यानंतर तो शिर्डी साईनगर एक्सप्रेसने परस्पर निघाला. लोहमार्ग पोलिसांनी तांत्रिक तपास करीत त्याचे लोकेशन मिळविले. नंतर त्याला मनमाड रेल्वे स्थानकाहून (सिकंदराबाद एक्सप्रेमधून) ताब्यात घेतले. दलीपकुमार चव्हाण (४५) रा. अलवर, राजस्थान असे त्या जवानाचे नाव आहे. लोहमार्ग पोलिसांनी त्याला नागपुरातील सीआरपीएफ युनिटच्या ताब्यात दिले. दलीपकुमार हा सीआरपीएफ भोपाळ कुक म्हणून कार्यरत आहे. त्याला पत्नी, दोन मुले आणि आई वडील आहेत. त्याचे कुटुंब अलवर येथे राहते. त्याला निवडणूक बंदोबस्तासाठी जम्मू काश्मीरला जायचे नव्हते. त्याने युक्ती लढविली.

# अंधश्रद्धेचे बळी ठरलेल्या 'त्या' दोन चिमुकल्यांचे अखेर शवविच्छेदन

देशोन्नती वृत्तसंकलन

**गडचिरोली :** मुलांना ताप आल्याने आई - वडिलांनी रुग्णालयात न नेता अंधश्रद्धेपायी पुजाऱ्याकडे नेल्याने दोन चिमुकल्यांना जीव गमवावा लागल्याची दुर्देवी घटना अहेरी तालुक्यातील पत्तीगांव येथे काल ४ सप्टेंबर रोजी घडली. बाजीराव रमेश वेलादी (६ वर्षे) आणि दिनेश रमेश वेलादी (३ वर्ष), दोघेही रा. येर्रागड्डा अशी त्या मृत बालकांची नावे आहेत. आई - वडिलांनी शवविच्छेदन करण्यास नकार दिला होता. अखेर जिल्हा आरोग्य यंत्रनेने हस्तक्षेप करून आज दोनही चिमुकल्यांचे मृतदेह अहेरी येथे आणून त्याच्या मृतदेहाचे शवविच्छेदन केले.

पोळयाच्या सणानिमित्त रमेश वेलादी पत्नी आणि दोन्ही मुलांना घेऊन मुलांच्या मामाच्या गावाला पत्तीगाव येथे आले होते. त्या ठिकाणी या मुलांना ताप आला. उपचारासाठी डॉक्टरऐवजी त्या भावंडांना पुजाऱ्याकडे नेण्याची चूक आई-वडीलांनी केली. पुजाऱ्याने दिलेल्या जडीबुटीने त्या बालकांच्या प्रकृतीत सुधारणा होण्याऐवजी प्रकृती आणखीच बिघडली.

अखेर पायपीट करत त्यांनी मुलांना घेऊन जिमलगट्टा प्राथमिक आरोग्य केंद्र गाठले. मात्र तोपर्यंत दोन्ही भावंडांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर डॉक्टरांनी शवविच्छेदन करण्याची सुचना देऊनही आई-वडिलांनी नकार देत मुलांचे मृतदेह स्वतःच गावाकडे खांद्यावर टाकून घेऊन गेले.

### आई-वडिलांनी दिला होता शवविच्छेदनासाठी नकार



### अखेर शवविच्छेदन पार पडले

त्या बालकांचा मृत्यू नेमका कशामुळे झाला याचे निदान करणे आरोग्य विभागाच्या दृष्टिने महत्वाचे होते. त्यामुळे आज सकाळीच जिल्हा आरोग्य अधिकारी शिंदे हे अहेरी येथे पोहचले. आरोग्य विभागाने पत्तीगांव येथे शववाहिणी पाठवून दोनही बालकांचे मृतदेह अहेरी येथे आणून शवविच्छेदन केले व नंतर पुन्हा पोहचून दिले. शवविच्छेदन अहवाल प्राप्त झाल्यानंतर मुलांच्या मृत्यूचे नेमके कारण कळेल. त्यानंतर दोषींवर कारवाई करण्यात येणार असल्याचे जि. प. च्या मुख्य कार्यकारी अधिकारी आयुषी सिंह यांनी दिली.

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात नरेंद्र भांडे यांचे देहदान

देशोन्नती वृत्तसंकलन



**अकोला :** आपले संपूर्ण आयुष्य समाजसेवेसाठी खर्ची घालणारे नरेंद्र लक्ष्मणराव भांडे यांनी मृत्यूनंतर देहदान करण्याचा संकल्प केला होता. वृद्धपकाळामुळे नुकतेच त्यांचे निधन झाले असून त्यांच्या कुटुंबियांनी येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात त्यांचा देहदान केला आहे.

विशेष म्हणजे त्यांच्या पत्नी नलीनी नरेंद्र भांडे यांनी देखील अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात मरणोत्तर देहदानाचा संकल्प करुन समाजासमोर एक आदर्श प्रस्थापित केला आहे. मूळचे दर्यापूर तालुक्यातील चांदखेड येथील रहिवासी भांडे यांनी श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती संचालित जे. डी. पाटील सांगूळदकर महाविद्यालय दर्यापूर येथे विविध पदावर सेवा दिली होती. आपल्या सेवाकाळात व अधीक्षक पदावरून सेवानिवृत्त झाल्यानंतरही त्यांनी विविध सामाजिक, धार्मिक क्षेत्रात उल्लेखनिय कार्य केले होते . नरेंद्र भांडे यांच्या पच्छात पत्नी चार मुली जावाई व नातवंड असा मोठा आप्त परिवार आहे.

# विसर्जन विहिरींची आयुक्तांकडून तपासणी

### स्वच्छतेसह विहीरीवरील जाळ्यांची दुरुस्ती, सुरक्षेच्या उपाययोजना करण्याचे आदेश

देशोन्नती वृत्तसंकलन

**नगर :** गणेशोत्सव दोन दिवसांवर आला आहे. शहरात काही गणेशभक्त व भाविकांकडे दीड दिवस, पाच दिवसांचे गणपती असतात. त्यामुळे सर्व विसर्जन विहिरींची तत्काळ स्वच्छता करा. विहिरीतील गाळ काढून तेथे पाणी कमी असल्यास पाण्याची व्यवस्था करा, असे आदेश आयुक्त यशवंत डांगे यांनी अधिकारी, कर्मचाऱ्यांना दिले.

आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आयुक्त यशवंत डांगे यांनी बुधवारी सकाळी शहर व उपनगर परिसरात गणेश मूर्तींचे विसर्जन होणाऱ्या विहिरींची समक्ष पाहणी केली. प्रत्येक विहिरीची स्वच्छता करून तेथील गाळ काढून



घ्यावा. त्यात पाणी कमी असेल, तर पाण्याची व्यवस्था करून पाणी सोडावे. विसर्जनाच्या दिवशी विहिरींजवळ मोठी गर्दी होते. त्यामुळे कोणतीही दुर्घटना घडू नये, यादृष्टीने सुरक्षेच्या उपाययोजना करा. विहिरींवरील जाळयांची तपासणी करून आवश्यक असेल तेथे तत्काळ दुरुस्त्या करून घ्याव्यात, अशा सूचना त्यांनी दिल्या.

घरगुती गणपती व छोट्या गणेश मुर्तींसाठी स्वतंत्र हौद केले जातात. यावर्षीही त्याचे नियोजन करून त्याची ठिकाणे निश्चित करा. विसर्जन स्थळी निर्माल्य टाकण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था ठेवा. साचलेले निर्माल्य घेऊन जाण्यासाठी, मोठ्या गाड्यांमध्ये भरण्यासाठी गाड्यांची व्यवस्था करा. विहिरींसह विसर्जन स्थळी, परिसरात स्वच्छता करावी, असेही आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले.

# एससी व एसटींचे उपवर्गीकरण व क्रिमीलेयरचा निकाल रद्द करा

### चर्मकार विकास संघाचे मंत्री रामदास आठवले यांना निवेदन

देशोन्नती वृत्तसंकलन



**नगर :** सर्वोच्च न्यायालयाने एससी व एसटी यांचे उपवर्गीकरण व क्रिमीलेअरचा दिलेला निकाल रद्द होण्यासाठी चर्मकार विकास संघाच्या वतीने केंद्रीय राज्य सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांना प्रदेशाध्यक्ष संजय खामकर यांनी निवेदन दिले.

१ ऑगस्ट २०२४ रोजी सर्वोच्च न्यायालयाने एससी व एसटी यांचे उपवर्गीकरण व क्रिमीलेअर लागू करण्याचा अधिकार राज्यांना दिला आहे. या संदर्भात एससी व एसटी समाज भयभीत असून सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाने मोठी नाराजी पसरली आहे. हा निकाल एससी व एसटी समाजावर अन्यायकारक व समाजा-समाजात दुरावा निर्माण करणारा असल्याचा आरोप चर्मकार विकास संघाच्यावतीने करण्यात आला आहे.

हा निकाल एससी व एसटी यांच्यात कटुता निर्माण होऊन एससी, एसटी समाजाच्या विभाजनास खतपाणी घालणारा ठरणार आहे. या निकालचे गांभीर्य ओळखून या निकाला संदर्भात तात्काळ केंद्रीय विशेष अधिवेशन बोलावून सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निकाल एकमताने रद्द करावा व एससी एसटी यांच्यावर झालेल्या अन्यायाला न्याय देण्याची मागणी चर्मकार विकास संघाच्यावतीने करण्यात आली आहे. यावेळी जिल्हाध्यक्ष संतोष कानडे, युवा गटई जिल्हाध्यक्ष रुपेश कांबळे, संतोष कांबळे, दिलीप कांबळे उपस्थित होते.

# शिक्षक समन्वय संघातर्फे जिल्ह्यात शिक्षक दिन काळा दिवस म्हणून साजरा

देशोन्नती वृत्तसंकलन

**हिंगोली :** राज्यातील शिक्षक वर्गाचे प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी राज्य सरकार टाळाटाळ करीत असून आज शिक्षक दिनी हिंगोली जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्र राज्यात शिक्षक दिन हा काळा दिवस म्हणून साजरा करण्यात आला.

यावेळी हिंगोली, कळमनुरी, वसमत, सेनगाव औंढा नागनाथ या पाच ही तालुक्यातील प्राथमिक माध्यमिक उच्च

### पाचही तालुक्याचा सहभाग

माध्यमिक कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक वर्गाने काळ्या फिती लावून शासनाचा निषेध नोंदविला आहे. याला हिंगोली जिल्ह्यातून भरपूर प्रतिसाद मिळाला असून शासनाने पुढील आठ दिवसात निर्णय घेतला नाही तर हिंगोली जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील शाळा महाविद्यालय बंद करून आझाद



मैदानावर शिक्षक बांधव धडकेल याची सर्वस्वी जबाबदारी ही शासनाची असेल असे यावेळी समन्वय संघाने सरकारला एक इशारा दिला आहे. आज शिक्षक दिनीच शिक्षक वर्गाला रस्तावर आणण्याचे काम या शासनाने केले आहे. आपल्या हक्काच्या मागणीसाठी गेली एकवीस दिवसापासून शिक्षक समन्वय संघ हा आझाद मैदानावर ठाण मांडून बसलेला आहे तसेच कोल्हापूर येथे अन्नत्याग आंदोलन सूरू असून शासन अजूनही निर्णय घेत नाही या शासनाच्या भूमिका विरुद्ध आजच्या शिक्षक दिनी शिक्षक रस्त्यावर उतरून आंदोलन करीत आहे.

# वाद्य पथकांनी ध्वनी मर्यादेचे पालन करावे : अमोल भारती

देशोन्नती वृत्तसंकलन



**नगर :** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शासन निर्देशानुसार वाद्यपथकांसाठी ध्वनी मर्यादा राखून दि. ८, ११, १२ व १७ सप्टेंबर असे चार दिवस स. ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत वाद्य वादन व ध्वनीवर्धक वापरासाठी सूट देण्यात आली असून या ध्वनी मर्यादेचे सर्व वाद्यपथकांनी पालन करावे असे आवाहन शहर विभागाचे पोलीस उपअधीक्षक अमोल भारती यांनी केले आहे.

शहरातील सर्व वाद्यपथक संघ प्रमुखांची बैठक जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात आयोजित करण्यात आले होती. त्यावेळी महत्त्वपूर्ण सूचना श्री भारती यांनी वाद्यपथक प्रमुखांना केल्या. पारंपारिक वाद्य व ढोल पथकांकडून महाराष्ट्राची संस्कृती जपण्याचे कार्य होत आहे. ही संस्कृती टिकवणे व वाढवणे ही काळाची गरज असल्याचेही श्री भारती यांनी यावेळी सांगितले. येत्या गणेशोत्सवाच्या दरम्यान सर्वांनी कायद्याचे तसेच ध्वनी मर्यादांचे पालन करून उत्कृष्ट सादरीकरण करावे, असे आवाहन देखील यावेळी भारती यांनी केले.

बैठकीस रुद्रवंशचे प्रशांत मुनफन, मंगेश बांदल, युगांत प्रतिष्ठानचे योगेश बुक्कन, अक्षय चेमटे, धीरज वागस्कर, युगंधरचे आकाश पटवेकर, हिंदवी शौर्यचे सुनील करांडे, सुनील विश्वकर्मा, आकाश शेलार, नाद प्रतिष्ठानचे सागर आहेर, केतन खरपुडे, रुद्रनादचे गगन शिंदे, सौरभ जावळे, शुभम वाल्हे, हरिभूमी प्रतिष्ठानचे अभय ललवाणी, ऋषिकेश ललवाणी, पो.हे.कॉ. सचिन जाधव आदी उपस्थित होते.

# लोकसहभागातून सार्वजनिक स्वच्छतेचा जागर

### नागपूर महापालिकेचा उपक्रम

**नागपूर :** शहर स्वच्छतेकरिता महापालिकेकडून विविध उपक्रम राबवण्यात येत असून प्रत्येक महिन्याच्या पहिल्या तारखेला सार्वजनिक सहभागातून शहर स्वच्छ करण्यात येते. नुकत्याच झालेल्या या उपक्रमात महापालिकेच्या दहाही झोनमध्ये नागरिकांनी सहभागी होत स्वच्छतेचा जागर केला. मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या मार्गदर्शनात दहाही झोनमधील विविध ठिकाणी हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. लक्ष्मीनगर झोनअंतर्गत येणाऱ्या डेट टब, उर्वेला कॉलनी (प्रभाग १६), अजनी चौक, धरमपेठ झोनअंतर्गत येणाऱ्या हिल टॉप (प्रभाग १३), हनुमाननगर झोनअंतर्गत मानेवाडा जुनी बस्ती (प्रभाग ३४), धंतोली झोनअंतर्गत चिंचभवन (प्रभाग ३५), नेहरूनगर झोनअंतर्गत रमना मारुती मेन रोड (प्रभाग २८), गांधीबाग झोनअंतर्गत येणाऱ्या सुदर्शन समाज भवनजवळ शिरसपेठ कॉलनी (प्रभाग १८), सतरंजीपुरा झोनअंतर्गत येणाऱ्या राणी दुर्गावती चौक एनआयटी गार्डन जवळ (प्रभाग ५) येथे नागरिकांनी अस्वच्छ परिसराची साफसफाई केली.



**अहमदनगर :** शिक्षक दिनानिमित्त नगरच्या प्रेरणा प्रतिष्ठानच्यावतीने शहर व उपनगरातील सर्व शाळा, महाविद्यालयातील शिक्षकांचा आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# जात, धर्म, पंथाच्या पलिकडे जाऊन शिक्षक विद्यार्थ्यांना माणूस म्हणून घडविण्याचे काम करतो

देशोन्नती वृत्तसंकलन

**नगर :** जात, धर्म, पंथाच्या पलिकडे जाऊन शिक्षक विद्यार्थ्यांना माणुस म्हणून घडविण्याचे काम करत असतो. यातूनच सक्षम भारत घडत आहे. भवितव्य घडविण्यासाठी मुलांचा पाया सक्षम करण्याचे काम शिक्षक करत आहे. शिक्षक हा समाजाची पायाभरणीचे काम करत असून, त्यांच्यामुळे समाजव्यवस्था चांगल्या दिशेने जात आहे. शिक्षकांमुळे समाज व्यवस्था टिकून असल्याची भावना आमदार संग्राम जगताप यांनी व्यक्त केली.

शिक्षक दिनानिमित्त प्रेरणा प्रतिष्ठानच्या वतीने शहर व उपनगरातील सर्व शाळा, महाविद्यालयातील शिक्षकांचा आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी आमदार जगताप बोलत होते. टिळकरोड येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी अशोक कडूस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या शिक्षकांच्या सन्मान सोहळ्याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून प्राथमिक शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी भास्करराव पाटील, माजी प्राचार्य खासेराव शितोळे, मनपा शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी जुबेर पठाण, हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष शिरीष मोडक, राष्ट्रवादीचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, संयोजन समितीचे प्रा. माणिक विधाते, ज्ञानदेव पांडुळे, माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष आप्पासाहेब शिंदे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संचालन उद्धव कालापहाड यांनी केले. आभार ज्ञानदेव पांडुळे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नियोजन समितीचे बाबासाहेब बोडखे, महेंद्र हिंगे, प्रशांत नन्नवरे, संदीप भोर, बन्सी नरवडे, विठ्ठल उरमुडे, सुभाष येवले, शिवाजी म्हस्के, शेखर उंडे, राष्ट्रवादीचे सुरेश बनसोडे, मारुती पवार, सागर गुंजाळ, अमित खामकर आदींसह अहमदनगर जिल्हा मुख्याध्यापक, शिक्षक शिक्षकेतर समन्वय समितीच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

### १५३ शिक्षकांचा आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मान

आमदार जगताप म्हणाले की, शिक्षकांची भूमिका समाजात महत्त्वाची आहे. पूर्वी असलेल्या मास्तरांची हातातली छडी कमी झाल्याने त्यांचा धाक विद्यार्थ्यांमध्ये सध्या कमी झाला आहे. चांद्रयान यशस्वी झाले त्याचे श्रेय देखील शिक्षकांना जात आहे. ज्या वैज्ञानिकांना शिक्षकांनी घडविले त्यांनी ही मोहिम यशस्वी केली. प्रत्येक यशस्वी व्यक्तीच्या मागे शिक्षक असतो. शिक्षकांचे उपकार व कृतज्ञता कोणीही फेडू शकत नसल्याचे त्यांनी सांगितले.

### आ. संग्राम जगताप यांचे प्रतिपादन



# इस्त्रायल दूतावासाबाहेर अज्ञाताकडून गोळीबार

## दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न

देशोन्नती वृत्तसंकलन

**इस्त्रायल :** म्युनिकमधील इस्रायली दूतावासाबाहेर एका शूटरने अनेक वेळा गोळीबार केला. यादरम्यान एकच गोंधळ उडाला. याचा एक व्हिडिओही जारी करण्यात आला आहे. ज्यामध्ये एक व्यक्ती पळताना दिसत आहे, तर अनेक गोळ्यांचे आवाज ऐकू येतात. या घटनेनंतर डझनभर पोलीस अधिकारी घटनास्थळी पोहोचलेत.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अधिकाऱ्यांनी एका संशयितावर गोळ्या झाडल्या, तो जखमी झाला आणि सध्या परिसराची नाकेबंदी करण्यात आली आहे. म्युनिक पोलिसांनी ट्विटरवर लिहिले की, सध्या ब्रिएनरस्ट्रास आणि कॅरोलिनप्लॅट्झ परिसरात मोठी कारवाई सुरू आहे. आमच्याकडे अनेक आपत्कालीन कर्मचारी आहेत. आम्ही तुम्हाला विनंती करतो की हे क्षेत्र शक्य तितके टाळावे.

# अपर्णा यादव भाजप सोडण्याच्या तयारीत?

## सपाच्या 'या' दिग्गज नेत्याशी साधला संपर्क

देशोन्नती वृत्तसंकलन




**लखनौः** भारतीय जनता पक्षाच्या नेत्या अपर्णा यादव या पक्षाला मोठा धक्का देण्याच्या तयारीत असल्याचे दिसत आहे, कारण अपर्णा यादव या पुन्हा एकदा समाजवादी पक्षात जाणार असल्याची शक्यता वर्तवण्यात येतआहे. २०२२च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी भाजपमध्ये प्रवेश केलेल्या अपर्णा यांची नुकतीच महिला आयोगाच्या उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तरीही त्यांनी हा निर्णय घेणे हे सर्वांसाठी धक्का असल्याचे बोलले जात आहे.

काही दिवसांपूर्वी अपर्णा यादव यांची महिला आयोगाच्या उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. यावरून अपर्णा यादव नाराज असल्याचा दावा सूत्रांनी केला आहे. अपर्णा महिला आयोगाच्या उपाध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारण्यास तयार नसल्याचा दावा सूत्रांनी केला आहे.

# कोकणात निघालेल्या दोन बस कंटेनरवर धडकल्या

## अचानक ब्रेक मारल्यामुळे दुर्घटना

देशोन्नती वृत्तसंकलन



**मुंबई :** गणेशोत्सवासाठी गावाकडे जाण्यासाठी चाकरमान्यांची गर्दी सुरू झाली आहे. त्यातच कशेडी घाटात गावाकडे कोकणात निघालेल्या दोन बस कंटेनरवर धडकल्यामुळे भीषण अपघात झाल्याची घटना घडली. यामध्ये ८० प्रवासी होते, पण सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नसून सर्व प्रवासी सुखरूप असल्याची माहिती समोर आली.

गणेशोत्सवात कोकणात जाणाऱ्या दोन बस कंटेनरवर धडकल्यामुळे भीषण अपघात झाला आहे, पण दैव बलवत्तर म्हणूनच ८० प्रवासी सुखरूप बचावलेत. कशेडी बोगद्यात बाईकला वाचवण्यासाठी कंटेनरने अचानक ब्रेक मारला, त्यामुळे मागून येणाऱ्या प्रवाशांनी भरलेल्या दोन बस एकमेकांवर आदळल्या आणि भीषण अपघात झाला. सुदैवाने बसमधील ८० प्रवासी सुखरुप बचावले आहेत. तसेच, बाजूने जाणारा दुचाकीस्वारही थोडक्यात बचावला आहे.

# कचऱ्यात मिळाले पासबुक अन् बदलली लाईफ

## बँक कर्मचाऱ्यांना धक्का बसला

वृत्तसंस्था

**बँकाक :** कचऱ्याच्या ढिगाऱ्यात पडलेल्या पासबुकने मुलगा बनवला करोडपती, ६० वर्ष जुने पासबुक पाहून बँक कर्मचाऱ्यांना धक्का बसला. बँकांच्या विविध योजना केवळ तुमचे पैसे वाचवण्यास मदत करत नाहीत तर कालांतराने ते वाढवण्यासही मदत करतात. अलीकडेच एका अनोख्या घटनेत एका बँकेच्या जुन्या पासबुकने एका माणसाला रातोरात करोडपती बनवले. या घटनेने गुंतवणुकीची दीर्घकालीन क्षमता अधोरेखित केली आहे.

एका तरुणाला त्याच्या वडिलांचे ६० वर्षांचे पासबुक सापडले जे अनेक दशकांपासून विसरले होते. या पासबुकमध्ये जमा केलेल्या रकमेवर राज्य हमी असल्याचा उल्लेख होता, त्यामुळे या रकमेवर मोठ्या प्रमाणात व्याज जमा झाले. वडिलांच्या जुन्या गोष्टी हाताळत असताना हा शोध लागला. चिलीमध्ये ही घटना घडली आहे जिथे झॅकेल हिनोजोसाच्या वडिलांनी काही वर्षांपूर्वी बँकेत थोडी रक्कम जमा केली होती. ही छोटी रक्कम काही दशकांच्या कालावधीत व्याजाच्या रूपात मोठ्या प्रमाणात वाढली, ज्यामुळे ही रक्कम एक मोठी मालमत्ता बनली.

# पूरस्थिती हाताळण्यात अपयश आलेल्या अधिकाऱ्यांना फाशी

वृत्तसंस्था



**दक्षिण कोरिया :** उत्तर कोरियाचा हुकूमशहा किम जोंग नेहमीच आपल्या सनकी निर्णयांमुळे चर्चेत असतो. सध्या त्यांचा देश भीषण पूरस्थितीला तोंड देत असून, आतापर्यंत हजारो लोक मृत्युमुखी पडलेले आहेत. ही पूरस्थिती हाताळण्यात अपयश आलेल्या ३० सरकारी अधिकाऱ्यांना फासावर लटकविण्याचे आदेश राष्ट्रप्रमुख किम जोंग यांनी दिले आहेत. याआधी, गेल्या महिन्यात किम जोंगने त्याच्या पक्षातील २० ते ३० लोकांच्या हत्येचे आदेश दिले होते.

पूरग्रस्त चागांग प्रांतातील पक्षाचा निलंबित सचिव कांग बोंग हून यालादेखील अटक करण्यात आली आहे.

ज्यांच्यामुळे या लोकांचा मृत्यू झाला त्यांना कठोर मृत्युदंड देण्यात आला आहे. या पुरामुळे नुकसान झालेल्या भागाची पाहणी स्वतः किम जोंगने केली. याचे काही व्हिडिओदेखील व्हायरल झाले होते. देशातील पुरामुळे झालेले नुकसान आणि सामान्य नागरिकांच्या मृत्यूमुळे संतापलेल्या किम जोंगने हा निर्णय घेत, देशातील भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या काळजीत वाढ केली आहे.

# पुणे जिल्ह्यात ८,४१७ मतदान केंद्र निश्चित

देशोन्नती वृत्तसंकलन

### विधानसभा मतदारसंघांसाठी पूर्वतयारी सुरू



**पुणे :** आगामी विधानसभेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाकडून पूर्वतयारी सुरू करण्यात आली आहे. मागील लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत यंदा मतदान केंद्रांची संख्या सुमारे ३०० ने वाढविण्यात आली आहे. जिल्ह्यातील २१ विधानसभा मतदारसंघात एकूण ८ हजार ४१७ मतदान केंद्र असणार आहे. मतदान केंद्रांची संख्या वाढविण्यात आल्याने मतदारांना मतदान करणे सोयीचे होणार आहे.

ग्रामीण भागातील जुन्नर विधानसभा मतदासंघात ३५६ मतदान केंद्रे असणार आहेत, आंबेगाव मतदार संघात ३४१ मतदान केंद्र, खेड आळंदी मतदार संघात ३८९ मतदान केंद्र, शिरूर मतदार संघात ४५७ मतदार केंद्र, दौंड मतदार संघात ३१० मतदान केंद्र, इंदापूर मतदार संघात ३३७ मतदान केंद्र, बारामती मतदार संघात ३८६ मतदान केंद्रे, पुरंदर मतदार संघात ४१३ मतदान केंद्रे, भोर-वेल्हा-मुळशी मतदार संघात ५६४ मतदान केंद्र आणि मावळ मतदार संघात ४०२ मतदान केंद्र असणार आहेत. तर, पिंपरी-चिंचवड शहरात तीन विधानसभा मतदारसंघ येतात. चिंचवड मतदार संघात ५६१ मतदान केंद्र, पिंपरी मतदार संघात ३९८ मतदान केंद्रे, भोसरी मतदार संघात ४८३ मतदान केंद्रे आहेत.





### मेघालय राज्याचा निर्णय

# बलात्कार पीडितांची 'टू फिंगर टेस्ट' बंद

**शिलांग :** बलात्कार पीडित महिलांची आरोग्य चाचणी करताना केली जाणारी टू फिंगर टेस्टवर सर्वोच्च न्यायालयाने बंदी घातलेली असतानाही ही चाचणी केली जात असल्याचे निदर्शनास आल्यानंतर मेघालय राज्याने अशा प्रकारे बलात्कार पीडित महिलेची चाचणी केली जाऊ नये यासाठी परिपत्रक काढले आहे. ही चाचणी करणाऱ्या डॉक्टरांवर शिस्तभंगाची कारवाई केली जाणार आहे.

सर्वोच्च न्यायालयात पोस्को कायद्याअंतर्गत एका खटल्यावर सुनावणी सुरू आहे. हा प्रकरणात पीडितेची टू फिंगर टेस्ट केली गेल्याचे न्यायमूर्ती जे. बी. पारधिवाला आणि संजय करोल यांच्या निदर्शनास येताच त्यांनी या प्रकरणी तीव्र नाराजी व्यक्त केली. त्यानंतर मेघालयाचे महाधिवक्ता अमित कुमार यांनी राज्यात अशा प्रकारची चाचणी बंद करण्यासाठीचे परिपत्रक काढल्याचे सांगितले. राज्यातील सर्व शासकीय आणि खासगी डॉक्टरांना हे परिपत्रक बंधनकारक असणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने २०२२ मध्ये झारखंड विरुद्ध शैलेंद्र कुमार राय या खटल्यात या चाचणीवर बंदीचा पुनरुच्चार केला होता.

### डॉक्टरांवर शिस्तभंगाची कारवाई होणार

पत्रकात म्हटले आहे की, 'ही चाचणी करणाऱ्या डॉक्टरांवर शिस्तभंगाची कडक कारवाई केली जाईल. कारवाईमध्ये निलंबन, दंड तसेच इतर कायदेशीर तरतुदींचा समावेश असेल. बलात्कार पीडितांना संवेदनशील आणि आदराची वागणूक दिली जाणे आवश्यक आहे, तसेच त्यांना मानसिक आधारीचीही गरज असते, हे लक्षात घेतले पाहिजे. त्यामुळे या परिपत्रकाची अंमलबजावणी केली जावी. बलात्कार पीडित महिलांची वैद्यकीय चाचणी करतान टू फिंगर टेस्ट केली जात असे. या चाचणीत डॉक्टर संबंधित महिलेच्या योनीची स्वतःच्या दोन बोटांनी तपासणी करत. या महिलेचे योनी पटल अबाधित आहे का, तसेच महिला लैंगिकदृष्ट्या सक्रिय आहे का, हे पाहाण्यासाठी ही चाचणी केली जात असे.

# बांगलादेशातील दहशतवाद्याची जामिनावर सुटका

वृत्तसंस्था

### काशिमपूर मध्यवर्ती कारागृहातून जामीन



**ढाका :** बांगलादेशमध्ये स्वीडन अस्लम म्हणून ओळखला जाणारा दहशतवादी शेख अस्लम याची मंगळवारी रात्री ढाक्याजवळील गाजीपूर येथील काशिमपूर मध्यवर्ती कारागृहातून जामिनावर सुटका करण्यात आली. तो खून आणि शस्त्रास्त्रांसह १२ वेगवेगळ्या गुन्ह्यांमध्ये हवा होता, असे काशिमपूर कारागृह अधीक्षकांनी सांगितले.

अस्लम हा २००० च्या दशकाच्या सुरुवातीला बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीच्या नेतृत्वाखालील चार पक्षांच्या आघाडी सरकारच्या कार्यकाळात घोषित केलेल्या २३ प्रमुख गुन्हेगारांपैकी एक आहे. त्याला ३१ जानेवारी २००५ रोजी अटक करण्यात आली आणि २०१४ मध्ये काशिमपूर कारागृहात ठेवण्यात आले होते. त्यापूर्वी त्याला वेगवेगळ्या तुरुंगात पाठवण्यात आले होते. तो काही काळ स्वीडनमध्ये राहिला आणि परत आल्यावर स्वीडन अस्लम हे टोपणनाव मिळाले.

# कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांना मोठा धक्का!

देशोन्नती वृत्तसंकलन

**कॅनडा :** कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांना मोठा धक्का बसला आहे, कारण खलिस्तान समर्थक एनडीपी नेते जगमीत सिंग यांनी ट्रुडो यांच्या सरकारचा पाठिंबा काढून घेण्याचा निर्णय घेतला आहे. एनडीपी पक्षाने सोशल मीडियावर एका व्हिडिओद्वारे ही घोषणा केली. पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांच्या उदारमतवादी सरकारसोबत केलेला करार तो संपवत असल्याचे सांगण्यात आले. सिंग यांनी व्हिडिओमध्ये म्हटले आहे की, जस्टिन ट्रूडो यांनी वेळोवेळी सिद्ध केले आहे की ते नेहमीच कॉर्पोरेट लोभापुढे झुकतील. त्यांनी जनतेची निराशा केली आहे. ते कॅनेडियन्सकडून दुसरी संधी देण्यास पात्र नाहीत.

### खलिस्तान समर्थक एनडीपीने पाठिंबा काढला



एनडीपीच्या प्रवक्त्याने सीबीसी न्यूजला सांगितले की, करार संपवण्याची योजना गेल्या दोन आठवड्यांपासून काम करत होती. व्हिडिओ ऑनलाइन लाइव्ह होईपर्यंत पक्षाने उदारमतवादी सरकारला आपल्या निर्णयाची माहिती दिली नाही, असेही ते म्हणाले. एका वरिष्ठ सरकारी सूत्राने सीबीसी न्यूजला सांगितले की, पंतप्रधान कार्यालयाला दुपारी १२:४७ वाजता कळवण्यात आले.

सिंग यांनी दुपारी १२.५५ वाजता हा व्हिडिओ सोशल मीडियावर पोस्ट केला. दोन पक्षांमधील विश्वास आणि पुरवठा कराराने उद्ध ने मार्च २०२२ मध्ये लिबरल सरकारला पाठिंबा देण्यास वचनबद्ध केले. अल्पसंख्याक उदारमतवादी सरकारचे अस्तित्व सुनिश्चित करणारा हा करार, संघराज्य स्तरावरील दोन पक्षांमधील पहिला औपचारिक करार होता. पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांनीही याबाबत प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले की एनडीपीने राजकारणावर लक्ष केंद्रीत करण्याऐवजी आपण कॅनेडियन लोकांसाठी काय करू शकतो यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे, जसे आपण गेल्या काही वर्षांत केले आहे.

# महाकालच्या शाही सवारीचे नाव बदलले!

**उज्जैन :** मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांनी मोठा निर्णय घेतला आहे. श्रावण महिन्यात सोमवारी उज्जैनमध्ये बाबा महाकालच्या शाही मिरवणुकीतून 'शाही' हा शब्द काढून टाकण्यात आला आहे. शाही हा शब्द इस्लामिक साम्राज्याशी निगडित असल्याने तो बदलण्यात यावा, अशी संतांनी मागणी केली होती. आता संत-मुनींची ही मागणी मान्य करण्यात आली आहे.

उज्जैनच्या महाकालमधील शाही सवारी सिंधिया राजघराण्याच्या काळापासून निघत आहे. उज्जैनमध्ये श्रावण सोमवारपासून सुरू होणाऱ्या जगप्रसिद्ध बाबा महाकालच्या शाही सवारीचे नाव बदलण्यात आले आहे.

# भारत-दक्षिण आफ्रिका नौदलात करारावर स्वाक्षऱ्या

### पाणबुड्यांच्या बचाव कार्यात सहकार्य वाढवणार

देशोन्नती वृत्तसंकलन

**नवी दिल्ली :** दक्षिण आफ्रिकी नौदलाच्या पाणबुड्यांवरील कर्मचाऱ्यांची अपघात किंवा दुर्घटनेच्या वेळी सुरक्षितता निश्चित करण्याबाबत अंमलबजावणी करारावर भारतीय नौदल आणि दक्षिण आफ्रिकी नौदल यांनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत. त्यामुळे समुद्रात द्विपक्षीय सहकार्य वाढवण्यातील महत्त्वाचा मैलाचा टप्पा गाठला गेला आहे.

भारतीय नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश कुमार त्रिपाठी आणि दक्षिण आफ्रिकी नौदल प्रमुख व्हाईस ॲडमिरल मॉंडे लोबेस यांनी करारावर स्वाक्षऱ्या केल्या. नौदल



सुरक्षा आणि परस्पर सहयोगाप्रती वचनबद्धता या अंमलबजावणी कराराने अधोरेखित केली आहे. या करारांतर्गत, भारतीय नौदल आवश्यकता भासेल तेव्हा आपले खोल बुडी मारणारे बचाव वाहन वापरून सहकार्य करेल जेणेकरून दोन्ही नौदलांमधील सहकार्याला अधिक पाठबळ मिळेल. ही भागीदारी भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील सागरी क्षेत्रातील संबंध दृढ करणारी आहे.



**मुंबई :** गणेशोत्सवासाठी मुंबईतील गणेशभक्त कोकणात आपल्या गावी जाण्यासाठी निघाले आहेत. मात्र, त्यांना वाहतूक कोंडीचा फटका बसला आहे. कोकणात जाणाऱ्या वाहनांची संख्या अचानक वाढल्यामुळे मुंबई-गोवा महामार्गावर प्रचंड वाहतूक कोंडी झाली आहे. रस्त्यावर वाहनांच्या लांबच लांब रांगा दिसत आहेत.

# ख्रिश्चनांचे सर्वोच्च धर्मगुरू पोप इंडोनेशियाच्या दौऱ्यावर

वृत्तसंस्था

**जकार्ता, (इंडोनेशिया) :** ख्रिश्चनांचे सर्वोच्च धर्मगुरू पोप फ्रान्सिस हे इंडोनेशियाच्या दौऱ्यावर असून तेथे त्यांनी जनतेला सौहार्द आणि वैविध्यतेतील सुसंवादाचे वचन पाळण्याचे आणि धार्मिक कट्टरतावाला विरोध करण्याचे आवाहन केले. पोप यांनी आशिया खंडातील चार देशांच्या दौऱ्याला आजपासून सुरुवात केली. ते ११ दिवस या दौऱ्यावर असणार असून प्रकृती साथ देत नसल्याने त्यांना या दौऱ्याचा ताण जाणवण्याचीही शक्यता आहे. पोप फ्रान्सिस हे ११ दिवसात इंडोनेशिया, पापुआ न्यू गिनी, इस्ट तिमूर आणि सिंगापूरच्या दौऱ्यावर जाणार आहेत. ते तब्बल ३२ हजार ८४१ किलोमीटरचा प्रवास करणार आहेत.



पोप यांनी इंडोनेशियाच्या दौऱ्याच्या पहिल्या दिवशी मावळते अध्यक्ष जोको विदोदो आणि अन्य महत्त्वाच्या पदाधिकाऱ्यांची अध्यक्षांच्या राजवाड्यामध्ये यांची भेट घेतली. त्यानंतर इंडोनेशियातील प्रमुख धर्मगुरू, भिक्षुणी आणि दार्मिक व्याख्या त्यांच्याही भेटी घेतल्या. इंडोनेशियाच्या १७ हजार द्विपसमूहावरील मानवी वैविध्यतेची तुलना त्यांनी केली. या प्रत्येकाची एक विशेषता आहे.

# ती चिनी महिला 14 वर्षांपासून अमेरिकेत राहुन करीत होती हेरगिरी

वृत्तसंस्था

**न्यूयॉर्क:** अमेरिकेतील न्यूयॉर्क राज्यातील एका वरिष्ठ अधिकारी महिलेवर चीनसाठी हेरगिरी केल्याचा आरोप ठेवण्यात आला आहे. या प्रकरणी त्यांच्यावर सध्या खटला चालवण्यात येत आहे. लिंडा सन असे या अधिकारी महिलेचे नाव असून त्यांनी कोरोना साथीच्या काळात न्यूयॉर्क राज्याच्या एका अधिकृत ऑनलाइन मीटिंगमध्ये सहभागी होण्यासाठीचा ॲक्सेस चीन सरकारच्या अधिकाऱ्यांना दिल्याच्या आरोपांसह इतरही काही आरोप त्यांच्यावर करण्यात आलेले आहेत. लिंडा सन यांच्यावर लावण्यात आलेल्या इतर आरोपांनुसार त्या अमेरिकेमध्ये अंडरकव्हर एजंट म्हणून चीनसाठी हेरगिरी करत होत्या.

# चिमुरड्याने उलटी केली, प्रियकराने बाळाला संपवले

**पुणे:** पुण्यातील बिबेवाडी परिसरातून एक संतापजनक बातमी समोर आली आहे. प्रेयसीच्या लहानग्या मुलाने रात्री उलटी केली म्हणून तिच्या प्रियकराने चिमुकल्याला इतके मारले की, यात त्याचा मृत्यू झाला. पुण्यातील बिबेवाडी परिसरातून हा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. मुलाने उलटी केल्याने आरोपीकडून चिमुरड्याला बेदम मारहाण करण्यात आली.

# 'मानसखंड एक्स्प्रेस' पर्यटकांसाठी ठरणार वरदान

देशोन्नती वृत्तसंकलन

**नवी दिल्ली :** ४०० प्रवाशांना घेऊन जाण्याची क्षमता असलेल्या ३ वातानुकूलित रेल्वे गाडी भाड्याने देण्याचा सामंजस्य करार उत्तराखंड पर्यटन विकास मंडळ आणि आयआरटीसीने फेब्रुवारी २०२४ मध्ये केला. 'मानसखंड एक्स्प्रेस' असे या रेल्वे गाडीला नाव देण्यात आले आहे. देशाच्या विविध भागातून उत्तराखंडपर्यंत रेल्वेचे जाळे वाढवण्याचा यामागचा उद्देश असल्याचे उत्तराखंड पर्यटन विकास मंडळाचे सचिव सचिन कुर्वे यांनी सांगितले. मानसखंड एक्स्प्रेस पर्यटकांसाठी उत्तम सुविधा प्रदान करत असल्याचे सचिन कुर्वे यांनी सांगितले. या फेरीमध्ये ऋषिकेश, बद्रीनाथ आणि केदारनाथचा समावेश होता. तर कार्तिक स्वामी मंदिर, बद्रीनाथ जाणारी दुसरी फेरी मुंबईहून ऑक्टोबर २०२४ च्या पहिल्या आठवड्यात नियोजित करण्यात आली आहे.

मानसखंड एक्स्प्रेसच्या पहिल्या दोन फेऱ्या पुण्यातून झाल्या. यावेळी प्रवाशांनी पूर्णगिरी मंदिर, नानकमत्ता गुरुद्वारा, चंपावत येथील चहाची बाग, हात कालिका मंदिर, पाताळ, भुवनेश्वर मंदिर, जागेश्वर मंदिर, गोलू देवता मंदिर, कैंची धाम, नंदा देवी मंदिर, कासार देवी मंदिर, सूर्य मंदिर कटरमळ आणि नैना देवी मंदिर या ठिकाणांना भेट दिली. रुद्रप्रयाग येथील कार्तिक स्वामी मंदिरसाठी मदुराई येथून जून २०२४ रोजी मानसखंड एक्स्प्रेसची एक फेरी झाली.

### उत्तराखंड पर्यटनासाठी पितृ छाया!

उत्तराखंड पर्यटन विभागातर्फे हरिद्वार, पंचप्रयाग, बद्रीनाथसाठी पितृ छाया एक्स्प्रेस सुरू करण्यात आली आहे. हिंदूंसाठी श्राद्ध/पितृपक्षाच्या काळात या एक्स्प्रेसचा फायदा आहे. पुण्याहून सुरू होणारी पितृछाया एक्स्प्रेस पर्यटकांसाठी उत्तम सुविधा प्रदान करते. आता पर्यटन विभागाकडून भोपाळपासून हरिद्वारला पोहोचण्यासाठी एक नवीन रेल्वे गाडी सुरू करण्याचा विचार सुरू आहे.

### तीन एसी गाड्याची निर्मिती



# रस्ता कामाला 'विद्युत खांबांचा' अडथळा!

**बोंबला** रस्त्याचे काम संथ गतीने नागरिक धुळीने त्रस्त

कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

नगर- बीड मार्गावरील साबलखेड ते चिंचपूर रस्ता चौपदरीकरणाचे कामाला या रस्त्यावर आडवे येणारे विद्युत खांब अडथळा बनले आहेत. त्यामुळे या रस्त्याचे काम अत्यंत संथ गती घेतली असून, वाहनांच्या वर्दळीमुळे प्रचंड धुळीचे लोट उडू लागल्यामुळे नागरिकांसह व्यावसायिक त्रस्त झाले आहेत.

नगर बीड मार्गावरील आष्टी तालुक्यातून जाणाऱ्या साबलखेड ते चिंचपूर हा रस्ता चौपदरीकरण काम म्हणजे 'सरकारी काम अन् सहा महीने थांब' अशा उक्तीप्रमाणे दोन मागील वर्षापासून संथ गतीने चालू असून, या कामावर कुणाचे नियंत्रण आहे की नाही. असा नागरीकांना पडला आहे. त्यातच या रस्त्यावर आडवे आलेले विधूत खांब अडथळा ठरू लागल्याने कामाची गती अजूनच मंदावली आहे. याबाबत महामार्ग अधिकाऱ्यांकडून वीज महावितरणला रस्ता कामाला अडथळा ठरणारे विद्युत खांब काढण्यासंदर्भात पत्र देऊनही महावितरणकडून अद्याप कुठलीही कार्यवाही होताना दिसत नाही. त्यामुळे रस्ता चौपदरीकरणाचे रखडल्याचे सांगण्यात येत आहे. तर दुसरीकडे वाहनांच्या वर्दळीमुळे धूळीचे लोट मोठ्या प्रमाणात हवेत उडत असल्याने नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले असून, नागरिकांसह व्यावसायिक त्रस्त झाले आहेत. वीज महावितरण कंपनीने या कामाला अडथळा ठरणारे विधूत खांब हटवून रस्ता चौपदरीकरण कामाला येणारा अडथळा त्वरित दूर करावा. अशी मागणी ग्रामपंचायत सदस्य बिपीन भंडारी यांनी केली आहे.



## धंदा करावा की धुळ साफ ?

साबलखेड ते चिंचपूर हा रस्ता चौपदरीकरणाचे काम मागील दोन वर्षापासून मंद गतीने चालू आहे. त्यातच यारस्त्यावर आडवे येणारे विधूत खांब आता अडथळा ठरत आहेत. त्यामुळे या रस्ता कामाची गती खांब न हटवल्यामुळे मंदावली आहे. या रखडलेल्या कामामुळे रस्त्यावरचे खड्डे, अन् ये-जा करणा-या वाहनांमुळे धुळीचे लोट उडू लागल्याने व्यावसायिक त्रस्त झाले आहेत. त्यामुळे धंदा करावा की, धूळ साफ करावी, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# धार्मिक सण-उत्सव शांततेत पार पडावेत!

**अपोअ चेतना तिडके:** कायद्याचे उल्लंघन करु नये!

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

गणेशोत्सव आणि ईद - ए - मिलाद व इतर सण उत्सव नागरीकांनी शांततेत साजरे करावेत. असे आवाहन अप्पर पोलीस अधिक्षक चेतना तिडके यांनी केले आहे. शनिवार (३१ ऑगस्ट) रोजी सायंकाळी ५.३० वाजता केज पोलीस ठाण्यात शांतता समितीची बैठक घेण्यात आली, यावेळी त्या बोलत होत्या. या शांतता बैठकीसाठी प्रभारी तहसीलदार सचिन देशपांडे, पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन, सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले, माजी नगराध्यक्ष कबिरोद्दीन इनामदार, दलिल इनामदार, फौजदार राजेश पाटील हे उपस्थित होते. पुढे बोलताना तिडके म्हणाल्या की, गणेश मंडळांनी पोलीस आणि महावितरणची रीतसर परवानगी घेऊन श्री ची स्थापना करावी.अनधिकृत वीज पुरवठा घेतल्यास कुठलीही अनुचित घटना घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी मंडळावर राहील. बिट अंमलदार नियमीतपणे भेटी देतील, तेव्हा दिवसा आणि रात्री मूर्तिजवळ मंडळाचा प्रतिनिधी असला पाहिजे. गस्त घालताना याचे निरीक्षण केले जाणार असून



मूर्तीचे पावित्र राखण्यासह एक भक्तिमय वातावरणात त्याचे विसर्जन करणे ही प्रत्येक मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची जबाबदारी आहे. मिरवणूकीसाठी वाहनांची तपासणी करून घ्यावी, वाहन चालक हा लायसन्स धारक असावा. तर त्याने मद्यपान केलेले नसावे. कुठले ही देखावे आक्षेपार्ह असू नयेत. कुठलेही आक्षेपार्ह गाणे वाजवू नयेत. आक्षेपार्ह वक्तव्य, मेसेज, पोस्ट सोशल मीडियावर करू नयेत. झेंडे, कमानी, पोस्टर वेळेत काढून घ्यावेत. मिरवणुकीच्या दिवशी कुठल्याही वादाचा विषय निर्माण होणार नाही, याची काळजी घेणे आपल्या सगळ्यांचे काम आहे.

# सरकारी स्त्यावरील अतिक्रमण काढा

**आक्रमक :** मोहा ग्रामस्थांचे आमरण उपोषण

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

तालुक्यातील मौजे मोहा येथील सरकारी पांदण रस्त्यावर करण्यात आलेल्या अतिक्रमणामुळे गावकऱ्यांना अडचण होत असल्याने व रहदारीचे दृष्टीने आवश्यक असलेल्या या रस्त्यावरील अतिक्रमण प्रशासनाने त्वरित काढावे या मागणीसाठी मोहा येथील ग्रामस्थांनी तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. दरम्यान उपोषणाचा दुसरा दिवस असून अद्याप तहसील प्रशासनाने यावर तोडगा काढलेला नाही.

याबाबत अधिक माहिती अशी की, मोहा येथे गावापासून एक किलोमीटर अंतरावर गावाकडे येणाऱ्या जाणाऱ्या सरकारी पांदण रस्त्यावर अतिक्रमण करण्यात आले आहे. त्यामुळे गावकऱ्यांना रहदारीस अडथळा निर्माण होत आहे. तसेच शालेय विद्यार्थी, विद्यार्थिनी ,शेतकरी सर्वांसाठी हा रस्ता अत्यंत महत्त्वाचा आहे. लहान मुले, महिला, वृद्ध पुरुष हे सुद्धा याच रस्त्याने ये जा करत असतात. परंतु या रस्त्यावर अतिक्रमण झाल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण झालेला आहे.




सदरील अतिक्रमण हटवण्यात यावे व पांदण रस्ता मोकळा करावा याबाबत दिनांक ५ सप्टेंबर रोजी मोहा येथील ग्रामस्थांच्या वतीने परळी तहसील कार्यालय व उपविभागीय कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्यात आलेले आहे. या उपोषणात मोहा येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झालेले आहेत.

# केज रोटरी करणार शिक्षकांचा सन्मान!

**आवाहन:** नेशन बिल्डर अवॉर्डस जाहीर!

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज रोटरी तर्फे दरवर्षी दिले जाणारे आदर्श शिक्षकांसाठीचे 'नेशन बिल्डर अवॉर्ड' अर्थात 'राष्ट्र उभारणी शिल्पकार अवॉर्डस २०२४ जाहीर झाले असून केज तालुक्यातील शिक्षण क्षेत्रात जिल्हा परिषद अंतर्गत सेवा देणाऱ्या दहा शिक्षक-शिक्षिकांना शिक्षकदिनी पुरस्कार जाहीर करण्यात आले असल्याची माहिती रोटरी क्लब ऑफ केज चे विद्यमान अध्यक्ष रो प्रकाश कामाजी, सचिव रो अनंत तरकसबंद, प्रोजेक्ट चेअरमन हनुमंत भोसले, श्रीराम देशमुख, प्रा डॉ बीजे हिरवे यांनी दिली आहे.शिक्षण क्षेत्र हे समाजाचे महत्वाचे क्षेत्र आहे. या क्षेत्रात प्रत्येक शिक्षकांचे कार्य महत्वाचे असले तरी जिल्हा परिषद अंतर्गत प्राथमिक शिक्षण सेवा देणाऱ्या शिक्षकांचे कार्य अत्यंत महत्वाचे आहे. कारण येथेच मुलांच्या मूलभूत शिक्षणाचा पाया भक्कम बनतो. म्हणून या शिक्षकांच्या सेवेचे अधिक महत्व वाटते. जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शिक्षण क्षेत्रात अनेक शिक्षक अत्यंत निष्ठेने व आवडीने आपली सेवा पार पाडतात. प्रत्यक्ष त्यांचे कार्य जाणून घेतल्यास समाजाला अभिमान वाटावा असे त्यांचे कार्य असून अशा शिक्षकांच्या पाठीवर समाजातून शाबासकीची थाप पडणे आवश्यक आहे. अनेक वेळा अशा चांगल्या पान २ वर...

# उल्लेखनिय कार्य अन् अध्यापनाची दखल!

**अभिनंदनिय :** डॉ. प्रकाश खेत्री सावित्रीबाई फुले पुरस्काराने सन्मानित

गंगामसला/पुण्यभूमी प्रतिनिधी

शिक्षक दिना निमित्त नागरी विकास सेवाभावी संस्था, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून दिला जाणारा राज्यस्तरीय सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षक पुरस्कार माजलगाव तालुक्यातील मोठीवाडी येथील रहिवासी डॉ.प्रकाश खेत्री यांना ज्येष्ठ विधीतज्ञ तथा जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष ड. आनंदसिंग बायस यांच्या हस्ते तेजस्विनी इंग्रजी शाळा, पुंडलिकनगर येथे प्रदान करण्यात आला.

यावेळी मा. श्री.मिलिंद पाटील, धर्मदाय कार्यालय, माजी सैनिक मा. श्री. नारायणराव भोसले, डॉ. गिताताई शोभवन, मा. श्री. चिमणरराव डुकरे, कार्यक्रमाचे




मुख्य संयोजक मा. श्री. एल. डी. ताटू साहेब, अँड सुभाष कोकुल्डे, भोरासिंग राजपूत, प्रा. गुरूदत्त राजपूत, अंजली कोकुल्डे व प्रा. भिमसिंग काहटे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. खेत्री हे डॉ. भीमराव आंबेडकर कनिष्ठ महाविद्यालय,कन्नड येथे समाजशास्त्र विभागात गेल्या २० वर्षा पासून कार्यरत आहेत, तसेच ते कनिष्ठ पान २ वर...

# पांढरवाडी खूनातील आरोपी अटक

**कारवाई:** तलवाडा पोलिसांनी पुण्यातून आवळल्या मुस्क्या!



तलवाडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलिस ठाणे हद्दीतील पांढरवाडी खून का बदला खून या घटनेने बीड जिल्हा हादरला होता तसेच बालाजी घरबूडे हत्याकांडातील मुख्य सुत्राधार अमोल भावले व त्यांचा भाऊ उमाजी भावले या दोघांना तलवाडा पोलिसांनी पिंपरी चिंचवड येथील चिखली पोलिस स्टेशन हद्दीतील पुणे येथून ताब्यात घेण्यात आले आहे.

याबाबद सविस्तर माहिती अशी अशी की, वडिलाची अटक पुर्व जामिन केल्याचा राग मनात धरून तलवाडा पोलिस ठाणे हद्दीतील पांढरवाडी या ठिकाणी गावाजवळ बालाजी घरबूडे (वय वर्ष) यांचा निघून हत्या करण्यात आली होती या प्रकरणी तलवाडा पोलिसांत सहा जणाविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला तसेच पोलिस अधीक्षक यांच्या कार्यलया समोर नातेवाईक यांनी अक्रोश केला पान २ वर...

# नुकसान झाले, निकस लावत बसू नका

**रमेश आडसकर:** शेतकऱ्यांना सरसगट आर्थिक मदत द्या



माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगांव, वडवणी व धारुर तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे खरीप हंगाम २०२४-२५ मध्ये झालेल्या पिकांचे आतोनात नुकसानीचे पंचनामे न करता सरसगट अर्थिक मदत करा अशी मागणी माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे नेते रमेशराव आडसकर यांनी येथील उपविभागीय अधिकारी यांच्या कडे केली आहे

तालुक्यातील किट्टी आडगाव या ठिकाणी भाजपा नेते यांनी आपल्या कार्यकर्ते समवेत प्रत्यक्ष शेतावर जाऊन पावसामुळे झालेल्या पिकांची पाहणी केली प्रचंड नुकसान पाहून त्यांना शेतकरी प्रति खूप वेदना झाल्या रमेशराव आडसकर यांनी शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी यासाठी काल येथील उपविभागीय अधिकारी यांना एक निवेदन दिले आहे यात पान २ वर...

# उत्कृष्ट देखावा मंडळास लाखांचे बक्षीस

**उपक्रम:** नोंदणी करण्याचे डॉ.योगेश,डॉ.सारिका क्षीरसागरांचे आवाहन

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीडमध्ये उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धेचे आयोजन सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या कल्पतरू प्रतिष्ठानच्या पुढाकारातून करण्यात आले आहे. या स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या सार्वजनिक गणेश मंडळांनी नाव नोंदणी करण्याचे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, कल्पतरूच्या सचिव डॉ.सारिका क्षीरसागर यांनी केले आहे.

गणेश चतुर्थीनिमित्त सार्वजनिक गणेश मंडळ लाडक्या बाप्पाच्या स्वागतासाठी तयार असून गणरायाचे आगमन एका दिवसावर येऊन ठेपले आहे. यावर्षी कल्पतरू प्रतिष्ठानच्या पुढाकारातून आकर्षक देखावे साकारणाऱ्या सार्वजनिक गणेश मंडळांना प्रोत्साहन देण्यासाठी स्पर्धेचे



आयोजन केले आहे. पहिल्या क्रमांकाच्या उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळास १ लाख १ हजार, द्वितीय क्रमांकास ५१ हजार आणि तृतीय क्रमांकास ३१ हजार इतक्या रक्कमेचे पारितोषिक, सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे. दरम्यान, उत्कृष्ट सार्वजनिक गणेश मंडळांच्या देखाव्यांची निवड करण्यासाठी पान २ वर...

**राजेंद्र मस्के** आहेरवडगावात रंगली बैलगाडा शर्यत

# बैलगाडा शर्यत ग्रामीण संस्कृतीची ओळख!

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बैलगाडा शर्यत महाराष्ट्रातील एक पारंपरिक क्रीडा प्रकार आहे. हौशी शेतकरी आपल्या बैलासह शर्यतीमध्ये आनंदाने भाग घेतात. ज्यामध्ये दोन बैलांचा एकजोड असलेल्या गाडीवर बसलेला शेतकरी त्यांना पळवून स्पर्धा करतो. ही शर्यत विशेषतः गावोगावी सण, उत्सव किंवा विशेष कार्यक्रमा दरम्यान घेतली जाते. बैलगाडी किंवा बैलगाडा हा ग्रामीण भागामध्ये हौशीचा विषय झाला आहे. पूर्वी बैल हा शेतीकामासाठी त्याचा वापर होयचा. परंतु आता बैलगाडा शर्यतीमध्ये आपला बैल स्पर्धेत टिकावा यासाठी पोटच्या मुलाप्रमाणे शेतकरी त्याच्यावर प्रेम दाखवत आहेत.

अशाच स्पर्धा गावोगावी झाल्या पाहिजेत. बैलगाडा शर्यत आपल्या कृषी संस्कृतीची व ग्रामीण महाराष्ट्राची ओळख आहे. ती जोपासली पाहिजे असे मत



भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी आहेरवडगाव येथे बैलगाडा शर्यत उद्घाटन पसंगी व्यक्त केले.


आज बीड विधानसभा मतदारसंघातील आहेर वडगाव येथे ग्रामस्थांच्या वतीने भव्य बैलगाडा शर्यतीचे आयोजन केले होते. या बैलगाडा शर्यतीत भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी सहभागी होत, बैलगाडा शर्यत, स्पर्धक व चालक - मालकांसोबत संवाद साधून त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी समवेत माजी पं.स.सदस्य लक्ष्मण काटे, सरपंच सुशांत खरसाडे, माजी सरपंच पोपट रोहिटे, माजी सरपंच वैजनाथ नेवाळे, माजी सरपंच बप्पासाहेब तावरे, विष्णु रोहिटे, उत्तम काटे, आत्माराम काटे, लक्ष्मण रोहिटे, रोहिटे सर, अनिल शेळके सह पंचक्रोशीतील नागरिक व बैलगाडा प्रेमी, शेतकरी बांधाव बहुसंख्येने उपस्थित होते.बीड जिल्ह्यामध्ये देखील पश्चिम महाराष्ट्रा सारख्या स्पर्धा होव्यात यासाठी सर्वात अगोदर पुढाकार घेणारे भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी गेल्या दोन वर्षापासून उत्कृष्ट असे बैलगाडा शर्यतीचे आयोजन करत आहेत.

# कोणत्याही अटी न लावता मदत द्या!

**वसंत मुंडे:** अतिवृष्टीमुळे शेतकरी सापडला अडचणीत

मुंबई पुण्यभूमी/प्रतिनिधी

महाराष्ट्र मध्ये खूप मोठ्या प्रमाणावर मराठवाडा विदर्भात दिनांक ३१ ऑगस्ट पासून ३ सप्टेंबर पर्यंत ढगफुटी अतिवृष्टी मुसळधार पाऊस झाल्यामुळे शेतकऱ्याचे हाती आलेले सोयाबीन कापूस तूर मका व इतर सर्व पिकांचे नुकसान झाले असून जमिनीचेही अतोनात माती वाहून गेल्यामुळे बांध फुटल्यामुळे पूर आल्यामुळे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांची जनावरे शेळ्या मेंढ्या कोंबड्या गाई म्हशी घरे जनावराची गोठे जनावराचे चारा,कडबा व इतर पशुखाद्य वाहून गेल्यामुळे सर्व बाजूने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. केंद्र व राज्य सरकारने एन डी आर एफ व एच डी आर एफ च्या नियमांना



बगल देऊन तात्काळ पंचनामे करून प्रतिहेक्टरी शेतकऱ्यांना ५० हजार रुपयाची आर्थिक मदत देण्याची मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी शासनाकडे निवेदनाद्वारे केली आहे. अगोदरच शेतीमालाला महाराष्ट्रातील अकार्यक्षम त्रिमूर्ती व मोदी सरकार भाव देण्यात असमर्थ ठरलेले असून शेतकरी वेगवेगळ्या खत बी बियाणे कीटकनाशके शेती अवजारे व जीवनावश्यक वस्तूवर जीएसटी चा टॅक्स देऊन आर्थिक संकटाचा सामना करीत असतानाच निसर्गाने हाती आलेले पिकांचेअतिवृष्टीमुळे ढगफुटीमुळे मुसळधार पावसाने नुकसान केले आहे.अतिवृष्टीमुळे जनावरे कोंबड्या शेळ्या मेंढ्या गाई म्हशी पुरात वाहून गेल्या व मरण पावले आहेत त्यांचे पंचनामे करून नियमात बसून आर्थिक मदत करावी, इलेक्ट्रिक मोटर शेतीची अवजारे चे खूप मोठ्या प्रमाणात वाहून गेल्यामुळे नुकसान झाले आहे. महाराष्ट्र मध्ये गुजरात मध्य प्रदेशच्या बोगस कंपन्यामार्फत बियाणे खते कीटकनाशके औषधी बोगस सतत पान २ वर...